RNI : MAHMAR/2022/88796
www.vidarbhkesari.com Vidabh Kesari News 90969 45629 @vidarbhkesari
vidarbhkesari21@gmail.com

दैंनिक विदर्भाचा मानबिंदू
# विदर्भ केसरी
मुख्य संपादक : अमोल कंटाळे
www.vidarbhkesari.com

अमरावती
४ शनिवार एप्रिल २०२६
✽ वर्ष ५ ✽ अंक ३०८
✽ पृष्ठ : ६ ✽ मूल्य रु : ३

# आमदार तायडेंच्या भावाला ठार मारण्याचा कट

## माजी मंत्री बच्चू कडूंसह तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

**विदर्भ केसरी। अमरावती :**

अपघाताचा बनाव करून आमदार प्रवीण तायडे यांचे चुलतभाऊ अभिजित दिगंबर तायडे (वय ४०) यांना ठार मारण्याचा कट रचण्याच्या आरोपाखाली माजी मंत्री ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू यांच्यासह अन्य दोघे अशा तिघांविरुद्ध शुक्रवारी (ता. ३) चांदूरबाजार ठाण्यात गुन्हा दाखल झाला. बच्चू कडू, शुभम ऊर्फ गोलू माहोरेसह अन्य एक अशी चांदूरबाजार ठाण्यात गुन्हा दाखल झालेल्या तिघांची नावे असल्याची माहिती पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांनी आज पत्रपरिषदेत दिली.



अचलपूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रवीण वसंतराव तायडे व त्यांचे चुलतभाऊ अभिजित दिगंबर तायडे (वय ४०, रा. काकडा) यांनी सदरप्रकरणात लेखी तक्रार केल्याचे पोलिस अधीक्षकांनी स्पष्ट केले. अभिजित हे आमदार प्रवीण तायडे यांच्या विधानसभा मतदारसंघात जनसंपर्क वाढविण्यासह इतर नियमीत कार्यक्रम घेत असतात. आमदार प्रवीण तायडे यांना राजकीय दृष्ट्या कमकुवत करण्यासाठी बच्चू कडू यांनी अभिजित तायडे यांना अपघाताचा बनाव करून ठार मारण्याचा कट डिसेंबर २०२५ मध्ये बच्चू कडू यांच्या काकडा येथील निवासस्थानी रचल्या गेला होता. त्याची ऑडिओ क्लिप आमदार तायडे यांनी तक्रारीसोबत पोलिसांकडे गुरुवारी (ता. २) सादर केल्याचे पोलिस अधीक्षकांनी सांगितले. त्या क्लिपची शहानिशा केल्यानंतरच पोलिसांनी एफआयआर नोंदविला आहे. त्या क्लिपमध्ये सदर साक्षीदाराने संभाषणाची रेकॉर्डिंग मोबाईलने केली आहे. साक्षीदाराचे नाव सुरक्षिततेच्या दृष्टीने गोपनीय ठेवण्यात येत असल्याचे एसपींनी स्पष्ट केले. आमदार अधिवेशनासह इतर कामात व्यस्त असल्याने त्यांनी विलंबाने तक्रार दिली.

रेकॉर्डिंग ही पेनड्राईव्हमध्ये तक्रारीसोबत पोलिसांकडे सोपविण्यात आली आहे. त्यात आमदार बच्चू कडू आणि त्यांचे सहकारी गोलु माहोरे व त्यांच्या ओळखीतील एक व्यक्ती यांनी अपघाताचा बनाव करून तक्रारकर्त्या यांना जिवानिशी ठार मारण्यास प्रोत्साहन देऊन कट रचल्याने त्यांच्याविरुद्ध कारवाईची मागणी तक्रारीत करण्यात आली आहे. आमदार प्रवीण तायडे व त्यांचे भाऊ यांच्या जिवाला संबंधीतांपासून धोका असल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. त्यामुळे बच्चू कडू, गोलु माहोरेसह एक समर्थक या तिघांविरुद्ध कायदेशीर कारवाईची मागणी करण्यात आली आहे.

### रेकॉर्डिंगची सत्यता तपासल्या जाईल

■ सदर प्रकरणातील पुराव्यांची आणि रेकॉर्डींगची सत्यता तपासणीकरीता पेनड्राईव व ज्या मोबाईलने रेकॉर्डिंग केल्या गेली तो मोबाईल सुद्धा तपासणीकरीता न्यायवैद्यकीय प्रयोगशाळेकडे पाठविण्यात येणार आहे.

### शक्य असल्यास सुरक्षेत वाढ

■ आमदार प्रवीण तायडे व तक्रारकर्ता अभिजित तायडे या दोघांच्याही जीविताला धोका असल्याची तक्रार असल्यामुळे त्याची शहानिशा करून दोघांचीही वैयक्तिक सुरक्षेसह शक्य असल्यास निवासस्थानाचीही सुरक्षा वाढविल्या जाईल, असे पोलिस अधीक्षकांनी सांगितले.

### आमच्या विरोधात हा कट

■ आम्ही रक्तदान करणारे लोक आहोत, जीव घेणारे नाहीत. परंतु आमच्या विरोधातच कट रचल्या जात आहे. आमचे शेतकऱ्यांसाठी आंदोलन सुरू आहे. ते दाबण्यासाठी तसेच कार्यकर्त्यांचे मनोबल खच्चीरण करण्यासाठी हा कट रचण्यात येत आहे. परंतु आम्ही घाबरणार नाही, प्रभू श्री रामचंद्रांच्या मंदिरात आम्ही अटक होऊ. आमच्या आयुष्यात असले प्रकार आम्ही कधीच केले नाहीत. हा आमचा आवाज दाबण्याचा प्रयत्न आहे, अशी प्रतिक्रिया बच्चू कडू यांनी दिली

## IPL मध्ये पंजाब किंग्सचा सलग दुसरा विजय

**विदर्भ केसरी।**

आयपीएलच्या ७ व्या सामन्यात, पंजाब किंग्सने चेन्नई सुपर किंग्सचा ५ गडी राखून पराभव केला. हा PBKS चा सलग दुसरा विजय, तर CSK चा सलग दुसरा पराभव ठरला. चेपॉक स्टेडियमवर नाणेफेक गमावल्यानंतर प्रथम फलंदाजी करताना, चेन्नईने ५ गड्यांच्या मोबदल्यात २०८ धावांची एकूण धावसंख्या उभारली. पंजाबने १८.४ षटकांतच हे लक्ष्य यशस्वीरित्या गाठले आणि त्यासाठी त्यांना केवळ ५ गडी गमवावे लागले. PBKS कडून, कर्णधार श्रेयस अय्यरने अर्धशतक झळकावले. प्रभसिमरन सिंगने ४३ धावांचे योगदान दिले, प्रियांश आर्यने ३९ धावा केल्या आणि कूपर कॉनलीने ३६ धावा काढल्या. विजयकुमार वैशाखने २ बळी घेतले. CSK कडून, आयुष म्हात्रेने अर्धशतक झळकावले. शिवम दुबेने ४५ धावा केल्या आणि सरफराज खानने ३२ धावा काढल्या. मॅट हेन्री आणि अंशुल कंबोज यांनी प्रत्येकी २ बळी घेतले.

## पोलीस शिपायाचीच हत्या

नागपूर : एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या मातोश्री नगर परिसरात गुरुवारी उशिरा रात्री घडलेल्या एका थरारक आणि धक्कादायक घटनेने नागपूर हादरले आहे. मुलीसोबत असलेल्या मैत्रीला विरोध केल्याच्या रागातून एका पोलीस कर्मचाऱ्याच्या मुलाने (तरुणाने) आपल्या साथीदारांसह राज्य राखीव पोलीस दलात चालक असलेल्या (एसआरपीएफ) शिपायाच्या छातीतच लोखंडी सळई खुपसली. या घटनेत शिपायाचा मृत्यू झाला असून एक नातेवाईक गंभीर जखमी आहे. पंकज ठाकूर (४२) असे दगावलेल्या एसआरपीएफमधील शिपायाचे नाव आहे.

## गॅसचा काळा बाजार

### समृद्धी महामार्गावरील घटना; हजारोंमध्ये गॅस विक्रीचा धक्कादायक प्रकार



**विदर्भ केसरी। छत्रपती संभाजीनगर :**

येथील समृद्धी महामार्गावर मध्यरात्री मोठी कारवाई करत दोन एलपीजी गॅस टँकर जप्त करण्यात आले आहेत. या टँकरमधील गॅस काळ्या बाजारात विकला जात असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

काल उशिरा रात्री समृद्धी महामार्गावर तपासणीदरम्यान अधिका-यांनी ही कारवाई केली. दोन संशयास्पद टँकरची तपासणी करण्यात आली. या तपासणीत मोठ्या प्रमाणावर एलपीजी गॅसचा साठा आढळून आला. हा गॅस व्यावसायिक सिलिंडरमध्ये भरून विक्रीसाठी वापरला जात असल्याची माहिती मिळाल्यानंतर अधिका-यांनी तात्काळ टँकर ताब्यात घेतले.

या प्रकरणाबाबत माहिती देताना विभागाचे अधिकारी चंद्रकांत डांगे यांनी सांगितले की, या टँकरमधील गॅस व्यावसायिक सिलिंडरमध्ये भरून काळ्या बाजारात विकला जात होता. एका सिलिंडरची किंमत ५ हजार ते १० हजार रुपयांपर्यंत आकारली जात असल्याचा प्राथमिक अंदाज आहे. या प्रकारामुळे शासनाचे मोठे आर्थिक नुकसान होत असल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. सध्या या प्रकरणाचा अधिक तपास सुरू असून यामागील संपूर्ण साखळी उघड करण्यासाठी यंत्रणा प्रयत्न करत आहेत.

## वीज कोसळून शेतकरी जागीच ठार

**विदर्भ केसरी। कराड :**

तालुक्यातील भोळेवाडी येथे आज शुक्रवारी दुपारी तुफान अवकाळी पावसातील विजेच्या कडकडाटात शेतकरी दाम्पत्यावर वीज कोसळून सतीश नाथा सूर्यवंशी (५१, रा. भोळेवाडी, ता. कराड) हे जागीच ठार झाले, तर त्यांची पत्नी उषा सतीश सुर्यवंशी या गंभीरपणे जखमी झाल्या आहेत. या दुर्दैवी घटनेने भोळेवाडी परिसर शोकमग्न झाला असून, जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, सतीश सूर्यवंशी हे आपली पत्नी उषा व भावजयसह 'माळ' नावाच्या शिवारात शेतीच्या कामासाठी गेले होते. आणि दुपारी पावणेतीन वाजण्याच्या सुमारास अचानक आलेल्या जोरदार अवकाळी पावसासह विजांचा प्रचंड कडकडाट सुरू झाला. त्यावेळी पावसापासून बचाव करण्यासाठी सतीश सुर्यवंशी व त्यांची पत्नी उषा हे दोघे जवळील लिंबाच्या झाडाखाली थांबले.

सतीश हे झाडाला टेकून उभे होते, तर उषा या काही अंतरावर बसल्या होत्या. याच वेळी अचानक त्या झाडावर वीज कोसळली. आणि सतीश सूर्यवंशी यांचा जागीच मृत्यू झाला, तर त्यांची पत्नी उषा या विजेच्या धक्क्याने जखमी झाल्या आहेत. यावर जवळच उभ्या असलेल्या त्यांच्या भावजयने आरडाओरड करत ही घटना तातडीने घरच्यांना कळवली. सुर्यवंशी कुटुंबीय व ग्रामस्थांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. परंतु, सतीश सुर्यवंशी यांचे निधन झाले असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. तर, उषा सुर्यवंशी यांचेवर उपचार सुरू आहेत.

### पत्नीचा मृत्यू, पती जखमी

■ **पुसद : शेतात कापूस वेचत असलेल्या शेतकरी दाम्पत्यावर अचानक वीज कोसळली. यात पत्नीचा जागीच मृत्यू झाला तर पती गंभीर जखमी झाला आहे. ही घटना शुक्रवारी ३ एप्रिल रोजी दुपारी ४ वाजता पुसद तालुक्यातील कुंभारी शिवारात घडली. सुमनबाई रोहिदास पवार (५०), असे यातील मृत महिलेचे तर रोहिदास हरी पवार (५५) असे जखमी पतीचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, खंडाळा पोलीस स्टेशन अंतर्गत पुसद तालुक्यातील कुंभारी येथील हनुमाननगर परिसरात ही हृदयद्रावक घटना घडली. रोहिदास हरी पवार व पत्नी सुमनबाई हे कापूस वेचणी करीत होते. दरम्यान पाऊस सुरू होऊन वीज पडली. त्यामध्ये सुमनबाई पवार हिचा जागीच मृत्यू झाला असून रोहिदास पवार जखमी आहे. त्यांच्यावर पुसद येथे उपचार सुरू आहे.**

## हजारो कुटुंबांच्या उदरनिर्वाहावर गदा

**विदर्भ केसरी। परळी वैजनाथ :**

नागरी सहकारी पतसंस्था, ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेत नित्यसंचय बचत ठेव प्रतिनिधी (पिग्मी एजंट) म्हणून काम करणाऱ्यांच्या पोटावर सहकार खात्याने पाय दिला असून त्यांना आता २.५ टक्क्याच्यावर पतसंस्थांकडून कमिशन मिळणार नाही. यामुळे या प्रतिनिधीमध्ये खळबळ उडाली असून या निर्णयाने त्यांच्यात तीव्र असंतोष पसरला आहे.

महाराष्ट्रात सुमारे सोळा हजारावर अशा पतसंस्था आहेत. या पतसंस्थेत पिग्मी एजंट म्हणून हजारो कर्मचारी कमिशनवर काम करतात. दररोज घरोघरी जावून नित्यसंचय ठेव आपल्या पतसंस्थेसाठी जमा करतात. हे मोठे कष्टाचे काम आहे, त्यांना सुट्टी घेता येत नाही, सुट्टी घेतली तर त्यांचे कमिशन बुडते. त्यामुळे त्यांना दररोज ग्राहकांच्या दारी जावेच लागते. पतसंस्था त्यांनी गोळा केलेल्या रक्कमेवर त्यांना तीन ते चार टक्के कमिशन देतात. यामुळे या पिग्मी एजंटला त्यांनी जमा केलेल्या ठेवीवर दरमहा दहा हजारापासून ते पंचवीस हजारापर्यंत कमिशन मिळते. ज्यांच्या मासिक ठेवी जास्त होतात. त्यांना याहीपेक्षा जास्त कमिशन मिळते. यामुळे या एजंटच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह होतो. शिवाय पतसंस्थांकडे दररोज लाखो रूपये जमा होतात. यामुळे पतसंस्थांना दैनंदिन व्यवहार करणे अधिक सुलभ होते. पिग्मी एजंटला कमिशन किती द्यावे याचा अधिकार आजपर्यंत पतसंस्थांकडे होता. या संस्था आपली आर्थिक कुवत बघून एजंटला तीन ते चार टक्के कमिशन देत होत्या. सहकार खात्याने या संस्थांना सुधारित आदर्श उपविधी लागू केल्याने आता कमिशन देण्याबाबतचा निर्णय सहकार खात्याकडे गेला आहे.

दैंनिक विदर्भाचा मानबिंदू
विदर्भ केसरी
मुख्य संपादक : अमोल कंटाळे

!! पाहिजेत !!

कार्यालय व्यवस्थापक (Office Manager)
'दैनिक विदर्भ केसरी'च्या दर्यापूर येथील कार्यालयासाठी एक सक्षम, अनुभवी आणि तरुण कार्यालय व्यवस्थापक पाहिजे आहे.

पात्रता आणि आवश्यकता:

पत्रकारिता क्षेत्रातील ज्ञान तसेंच राजकीय पत्रकारिता आणि वृत्तपत्र कार्यालयाच्या कामाचा किमान २ वर्षांचा अनुभव असणे आवश्यक आहे.
**उत्तम जनसंपर्क:** स्थानिक राजकीय, सामाजिक आणि प्रशासकीय वर्तुळात चांगला जनसंपर्क असणे महत्त्वाचे.
**संगणक ज्ञान:** आणि इंटरनेटचे प्राथमिक ज्ञान असणे आवश्यक स्वतःची दुचाकी असणे अनिवार्य आहे.

■ शिक्षण: कोणत्याही शाखेचा पदवीधर
■ आकर्षक मानधन: पात्र उमेदवाराला योग्य आणि आकर्षक मानधन दिले जाईल.
■ एक प्रतिष्ठित आणि वेगाने वाढणाऱ्या माध्यम समूहात काम करण्याची संधी.

इच्छुक उमेदवारांनी खालील पत्त्यावर संपर्क साधावा:
कार्यालय: आयेशा टॉवर, दर्यापूर, जि. अमरावती.
संपर्क: ९९७५५३२२९१/९०९६९४५६२९

## लाडक्या बहिणी म्हणजे पगारी मतदार

### अपात्र लाभार्थ्यांना दिलेल्या पैशांची भरपाई कोण करणार? सुषमा अंधारे



**विदर्भ केसरी। मुंबई :**


शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून वगळण्यात आलेल्या महिलांच्या मुद्यावरून पुन्हा एकदा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारवर निशाणा साधला आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील अपात्र लाभार्थ्यांवर सरकारच्या तिजोरीतील २१ हजार कोटी पाण्यात गेल्याचा दावा केला जात आहे. या पार्श्वभूमीवर ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी सरकारवर उपरोक्त शब्दांत निशाणा साधला आहे. त्या म्हणाल्या, निवडणुकीच्या काळामध्ये नियोजनशून्य महायुतीने मतांच्या लालसेपोटी पैशांची खैरात केली. योजनेच्या नावाखाली पगारी मतदार मिळवण्याचा प्रयत्न केला. आता अचानक एवढ्या मोठ्या संख्येने लाडक्या बहिणींच्या लाभार्थ्यांमध्ये कपात केली. मग इतकी महिने महाराष्ट्राच्या तिजोरीतून गेलेला पैसा याची भरपाई कोण करणार..? एरवी क्रेडिट घेण्यासाठी पुढे येणा-या फडणवीस, शिंदे आणि आदिती तटकरे यांच्यापैकी आता कोण हे नुकसान भरून काढणार आहे? असा सवाल सुषमा अंधारे यांनी या प्रकरणी उपस्थित केला आहे. अंधारे यांनी आपल्या पोस्टमध्ये पाण्यात गेलेल्या २१ हजार कोटींचा हिशेब कोण देणार? याचे उत्तरही महायुती सरकारकडे मागितले आहे.



दैनिक विदर्भाचा मानबिंदू
विदर्भ केसरी
शनिवार, ४ एप्रिल २०२६


# कर्तव्यदक्ष अधिकारी तुकारामजी मुंढे यांची वारंवार बदली ही राज्याच्या जनतेसाठी धक्कादायक बाब.



रमेश कृष्णराव लांजेवार
(स्वतंत्र पत्रकार)
मो.नं. ९९२१६९०७७९, नागपूर.



मुंढे नावाच वादळ सरकारच्या काणात नेहमीच घोंगावत असते. जनुकाय मुंढे साहेब भ्रष्ट राजकीय पुढारी व अधिकाऱ्यांच्या स्वप्नात येतात व त्यांच्या मानगुटीवर बसतात की काय असे वाटत आहे.मुंढेनी सर्जीकल स्ट्राईक केला की,सरकारची आणि भ्रष्ट राजकीय पुढारी व भ्रष्ट अधिकाऱ्यांची घाबरगुंडी नेहमीच का उडत असते असे का? या घटनांवरून स्पष्ट होते की, राज्यात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचाराचे रॅकेट आजही जिवंत आहे.राज्यात सर्व काही सुरळीत चालू असतांना सनदी (आयएएस) अधिकाऱ्यांच्या बदल्या वारंवार का होतात? हा मोठा प्रश्न राज्याच्या १३ कोटी जनतेपुढे वारंवार उपस्थित होतो.अशा परिस्थितीत सर्वसामान्यांना वाटते की,हे राज्यात चाललय तरी काय!राज्यात अनेक कर्तव्यनिष्ठ अधिकारी आहेत आणि या अधिकाऱ्यांचा लाभ गरीब व सर्वसामान्यांना झाला असून मोठमोठ्या राजकीय पुढाऱ्यांची व अधिकाऱ्यांची पोलखोल झाली आहे व त्यांच्या मुसक्या सुध्दा आवळल्या आहे. एवढ काही सुरळीत सुरू असतांना दिनांक ३१ मार्च २०२६ मंगळवारला राज्य प्रशासनात मोठे फेरबदल करत तब्बल दहा सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश जारी केले आहेत. अचानक बदल्यांचे आदेश होत असेल तर राज्याचे दुर्भाग्यच म्हणावे लागेल. बदली झालेल्या अधिकाऱ्यांमध्ये नामवंत दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांचा समावेश आहे ही राज्याच्या दृष्टीने धक्कादायक आणि गंभीर बाब आहे. आश्चर्याची बाब म्हणजे गेल्या २१ वर्षातील मुंढे यांची ही २५ वी बदली असल्याचे सांगितले जाते.गेल्यावर्षी ऑगस्ट महिन्यात मुंढे यांची दिव्यांग कल्याण विभागात बदली झाली होती.२१ वर्षांत २५ बदल्या म्हणजे सरासरी त्यांचा प्रत्येक विभागाचा कार्यकाळ अल्पसा रहाला.यावरून स्पष्ट होते की, सरकार कर्तव्यनिष्ठ अधिकाऱ्यांना आपले काम सुध्दा इमानदारीने करू देत नाही ही बाब नुकत्याच झालेल्या (आयएएस) अधिकाऱ्यांच्या बदल्यांवरून स्पष्ट होते. बदल्यांच्या कारणांची पडताळणी सरकार का करीत नाही? आणि अधिकाऱ्यांच्या बदल्या त्यांचा कार्यकाळ अपुरा ठेवून वाटेल तेव्हा बदली करण्यात येते अशा परिस्थितीत अधिकारी वर्ग भ्रष्टाचारावर नियंत्रण कसे काय ठेवेल! बदलीसाठी सरकारजवळ नियम किंवा काहीच लिमिट किंवा अटी नाहीत का? केव्हाही बदली करणे ही बाब कोणत्या नियमात बसते, असे अनेक प्रश्न आज उपस्थित होत आहे. सन्माननीय तुकाराम मुंढे यांची दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली होती.नियुक्ती होताच त्यांनी संपूर्ण विभागाला धारेवर धरले व सर्व काळ्या चिठ्ठ्या बाहेर काढल्या व दिव्यांग कल्याण विभाग सुरळीत करण्याला सुरुवात केली. परंतु सरकारने अचानक बदल्यांचा भडीमार केल्याने सर्वसामान्यांचे मन दुखावले आहे.सरकारने ज्या दहा सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या आहेत त्या जनकल्याणाच्या प्रती नसाव्यात असे मला वाटते.यात सरकारने आपली पोळी शेकण्यासाठी बदल्या केल्या असाव्यात अशी शंका महाराष्ट्राची सर्वसामान्य जनता वर्तवीत आहे.धडाकेबाज निर्णयासाठी प्रसिद्ध असलेले तुकाराम मुंढे यांची वारंवार बदली करून सरकार काय सिद्ध करण्याचा प्रयत्न करीत आहे ही बाब अजूनपर्यंत सर्वसामान्य जनतेला समजु शकली नाही. आतातर २१ वर्षांत फक्त २५ बदल्या झाल्यात पुढे चालून ते भ्रष्ट राजकीय पुढारी व अधिकाऱ्यांना घाम सोडू शकते त्यामुळे त्यांच्या निवृत्तीच्या काळापर्यंत अंदाजे २०३५ पर्यंत बदलीची सेंच्युरी होऊ शकते यालाही नाकारता येत नाही.कारण मुंढे सारख्यांचे धाडसी कार्य कोणत्याही सरकारला पचणारे नाही.त्यामुळे कोर्ट कचेरीमध्ये ज्याप्रमाणे "तारीख पे तारीख" असा लपंडाव सुरू असतो त्याचप्रमाणे मुंढे सारख्यां कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांची "बदली पे बदली" असा सरकारकडून लपंडाव सुरूच राहिल ही बाब स्पष्ट होते.शेवटी हाही सरकारचा रेकॉर्ड ग्रीनीज बुकमध्ये नोंदवीला जाऊ शकतो.तुकाराम मुंढे यांनी दिव्यांग कल्याण मधील अनेक गैरप्रकार समोर आणले असतांना त्यांची बदली झाली. त्यामुळे या गैरप्रकारांवर पांघरूण घालण्यासाठी मुंढेची बदली करण्यात आली आहे ही बाब स्पष्ट होते.आता मुंढेची बदली आपत्ती व्यवस्थापन,मदत व पुनर्वसन विभागाचे सचिव या पदावर मंत्रालयात करण्यात आली आहे. याठीकाणीतरी सरकारने मुंढे साहेबांना आपल्या पध्दतीने काम करू द्यावे अशी सरकारकडून सर्वसामान्यांना अपेक्षा आहे.अन्यथा सर्वसामान्यांचा विश्वास सरकारवरून उठेल.मुंढे यांचा सर्वीस काळ अंदाजे २०३५ पर्यंत आहे मग २०३५ पर्यंत सरकार असाच लपंडाव खेळणार काय असे अनेक प्रश्न उपस्थित होतात.

या लेखाव्दारे सरकारला विनंती करतो की, सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्यांचा निश्चित कार्यकाळ ठरवावा व त्यानुसारच बदलीचे पाऊल उचलालेत जेणेकरून त्यांना आपले काम पुर्ण करण्याची संधी मिळेल. त्याचप्रमाणे सन्माननीय महामहीम राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांना विनंती करतो की, आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे गांभीर्य लक्षात घेऊन बदल्यांच्या संदर्भात राज्य सरकारला ठोस नियमावली व अटींची जाणीव करून द्यावी जेणेकरून आयएएस अधिकारी आपला कार्यकाळ पूर्ण करून सर्वसामान्यांना दिलासा देऊ शकेल व राज्य सरकारची बदलीच्या सिलसिल्यावर अंकुश लागेल. सन्माननीय तुकाराम मुंढे यांच्या कार्याला माझा सलाम.

## अग्रलेख

## व्यावसायिक संकटात!

इराण-इस्रायल युद्धाच्या पार्श्वभूमीवर व्यावसायिक सिलिंडरचा पुरवठा ४० ते ६० टक्के घटला असताना सिलिंडरच्या दरातही २० टक्क्यांहून अधिक वाढ झाल्याने छोट्या-मोठ्या शहरांतील हॉटेल व्यवसाय पुरता अडचणीत आला आहे. गत महिनाभरापासून व्यावसायिक सिलिंडरचा पुरवठा ४० ते ६० टक्क्यांनी घटला आहे. ज्या रेस्टॉरंटला आठवड्याला १० सिलिंडरची नितांत गरज आहे, त्यांना जेमतेम ४ ते ५ सिलिंडरवर समाधान मानावे लागत आहे. केवळ गॅस टंचाईच नाही, तर दरातील अनपेक्षित वाढीने हॉटेल मालकांचे कंबरडे मोडले आहे. गॅस मिळत नसल्यामुळे अनेक छोट्या-मोठ्या हॉटेल व्यावसायिकांनी पुन्हा एकदा कोळसा, लाकूड, डिझेल किंवा केरोसिनच्या जुन्या पद्धतीकडे वळण्यास सुरुवात केली आहे. मुंबईसारख्या दाटीवाटीच्या शहरात बहुतेक हॉटेल्स इमारतीच्या तळमजल्यावर आहेत. तिथे हे पर्याय अत्यंत धोकादायक ठरू शकतात. डिझेल, ओव्हन किंवा कोळशाचा वापर म्हणजे आगीच्या मोठ्या दुर्घटनेला आमंत्रण देण्यासारखे आहे. कोळशाच्या धुरामुळे हॉटेलमधील हवेची गुणवत्ता खालावते, ज्याचा थेट परिणाम तिथे काम करणा-या कर्मचा-यांच्या आरोग्यावर होतो. इंडक्शनचा पर्याय निवडला तर तिथेही व्यापा-यांनी संधी साधली आहे. ५ हजार रुपयांना मिळणारे इंडक्शन स्टोव्ह आता ३० ते ४० हजार रुपयांना काळ्या बाजारात विकले जात आहेत म्हणे. पश्चिम आशियातील तणावाच्या पार्श्वभूमीवर, सरकारी कंपन्यांनी बुधवारी व्यावसायिक एलपीजीच्या दरात १९५.५० रुपयांची वाढ केली. ही दरवाढ १९ किलोच्या सिलिंडर्सना लागू आहे. सरकारी कंपन्यांनी घरगुती सिलिंडर्सच्या दरात कोणताही बदल केलेला नाही. घरात वापरल्या जाणा-या एलपीजी गॅसचे दर 'जैसे थे'च आहेत. पश्चिम आशियातील संकट अधिक गडद होत चालल्याने त्याचे परिणाम भारतातही जाणवू लागले आहेत. सरकारी तेल कंपन्यांनी पुन्हा एकदा व्यावसायिक एलपीजी सिलिंडर्सच्या किमती वाढवल्या आहेत. पश्चिम आशियामध्ये तीव्र होत असलेल्या संघर्षामुळे या किमती वाढल्या आहेत. नवीन दर लागू झाल्यानंतर दिल्लीमध्ये १९ किलोच्या व्यावसायिक एलपीजी सिलिंडरची किंमत २०७८.५० रुपये इतकी झाली आहे. १ मार्च रोजी सरकारी तेल कंपन्यांनी १९ किलोच्या सिलिंडरची किंमत ११४.५० रुपयांनी वाढवली होती. पुरेशा गॅसअभावी हॉटेल व्यवसायाच्या 'चुली' विझण्याच्या मार्गावर आहेत. गत केवळ २७ दिवसांच्या कालावधीत व्यावसायिक सिलिंडरच्या दरात तब्बल २० टक्क्यांहून अधिक वाढ झाली आहे. एका १९ किलोच्या व्यावसायिक सिलिंडरमागे आता १९५ रुपयांची वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे एका सिलिंडरची किंमत २१०० रुपयांच्या वर गेली आहे. ही भाववाढ म्हणजे हॉटेल व्यावसायिकांच्या नफ्यावर थेट डल्ला आहे. विशेष म्हणजे अधिकृत मार्गाने सिलिंडर उपलब्ध नसताना, काळ्या बाजारात हेच सिलिंडर साडेतीन हजार ते ६ हजार रुपयांपर्यंत विकले जात असल्याचे वृत्त आहे. हा काळा बाजार थांबवण्यास प्रशासन अपयशी ठरल्याने प्रामाणिक करदाते, कायदेशीर व्यावसायिक पूर्णपणे हतबल झाले आहेत. हॉटेल उद्योग हा केवळ मालकांचा नसून, तो लाखो कामगारांच्या उदरनिर्वाहाचे साधन आहे. एकट्या महाराष्ट्रात या उद्योगातून सुमारे २ कोटी लोकांना थेट रोजगार मिळतो. पण गॅस टंचाईमुळे अनेक हॉटेल्सनी आपला 'मेन्यू' मर्यादित केला आहे आणि कामकाजाचे तास कमी केले आहेत. व्यवसाय मंदावल्यामुळे मालकांना कामगारांचे पगार देणे कठीण झाले आहे. त्यामुळे कोरोना काळाप्रमाणेच कामगार पुन्हा एकदा आपल्या मूळ गावी परतू लागले आहेत. एकदा हा कुशल कामगार शहर सोडून गेला की, परिस्थिती सामान्य झाल्यावरही त्याला परत मिळवणे हे एक मोठे आव्हान असते. त्यामुळे व्यवसायाचे दीर्घकालीन नुकसान होण्याची शक्यता असते. या संकटावर 'पीएनजी' हा एकमेव कायमस्वरूपी उपाय मानला जातो. 'आहार' संघटनेने यासाठी विशेष मोहीम राबवून हजारो सदस्यांना पीएनजीसाठी नोंदणी करण्यास प्रोत्साहित केले आहे. मोठ्या शहरात हे सारे शक्य आहे. पण तिथेही प्रशासकीय लालफितीचा कारभार आडवा येत आहे. मोठ्या शहरात रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण झाल्यामुळे नवीन गॅस लाईन टाकण्यासाठी रस्ते खोदणे हे एक जिकिरीचे काम झाले आहे. महानगरपालिकेकडून खोदकामाची परवानगी मिळवणे हे अत्यंत कठीण असून आता पावसाळा तोंडावर असल्याने मे महिन्यानंतर खोदकामावर बंदी येईल. जर आता युद्धपातळीवर पीएनजी कनेक्शन दिले गेले नाहीत, तर ऑक्टोबरपर्यंत हे हॉटेल व्यावसायिक गॅसच्या टंचाईत होरपळत राहतील. युद्धामुळे एलपीजी गॅसच्या जागतिक तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर राज्यातील स्वदेशी उद्योगाबरोबर विदेशी गुंतवणुकीच्या उद्योगांना तसेच नागरिकांना गॅसचा पुरवठा सुरळीत व्हावा, यासाठी राज्य शासनामार्फत आवश्यक ते सर्व प्रयत्न करण्यात येत असल्याचे सांगून या संकटात कोणत्याही उद्योगाला राज्य शासन अडचण येऊ देणार नाही, असे राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी म्हटले आहे. केंद्र सरकारच्या निर्देशानुसार पहिल्या टप्प्यात हॉस्पिटल्स, शैक्षणिक व सामाजिक संस्था, दुस-या टप्प्यात रेस्टॉरंट्स व अन्न उद्योग, तर तिस-या टप्प्यात कामगार प्रधान उद्योगांना एलपीजी पुरवठा करण्यात येत आहे. मध्यपूर्वेतील युद्धामुळे उद्भवलेल्या जागतिक संकटाचा भारतीय नागरिकांवर परिणाम होऊ नये यासाठी केंद्र सरकार ॲक्शन मोडमध्ये आले आहे म्हणे. पंतप्रधान मोदी यांनी 'कॅबिनेट कमिटी ऑन सुरक्षा' (सीसीएस)ची महत्त्वपूर्ण बैठक घेऊन देशातील परिस्थितीचा आढावा घेतला.

## हॉटेल व्यावसायिकांना आता २० टक्के व्यावसायिक सिलिंडर

**विदर्भ केसरी। अकोला :**

आखाती देशांमधील युद्धजन्य परिस्थितीचा थेट परिणाम स्थानिक व्यवसायावर झाला. गेल्या २० ते २२ दिवसांपासून व्यावसायिक गॅस सिलिंडरचा पुरवठा हॉटेल, केटरिंग व्यावसायिकांना बंद असल्याने त्यांची 'गॅस कोंडी' झाली. व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या प्राधान्यक्रमात आता हॉटेल व्यावसायिकांचा सुद्धा राज्याच्या पुरवठा विभागाने समावेश केला. युद्धपूर्व स्थितीच्या प्रमाणात हॉटेल व्यावसायिकांना २० टक्के वाटा मंजूर केला. त्यामुळे हॉटेल व्यावसायिकांना दिलासा मिळाला आहे.

आखाती देशांतील युद्धामुळे जागतिक स्तरावर गॅस पुरवठा साखळी विस्कळीत झाली. त्याचा थेट परिणाम गॅस पुरवठ्यावर झाला. यामुळे व्यावसायिक गॅस सिलिंडरचा पुरवठा मर्यादित झाला. त्याचा परिणामी हॉटेल, केटरिंग व इतर खाद्यपदार्थ व्यावसायिकांवर होऊन मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. अकोला शहरात सुमारे ५०० हॉटेल, रेस्टॉरंट, स्वीट मार्ट, केटरर्स व्यावसायिक आहेत. गेल्या २० ते २२ दिवसांपासून व्यावसायिक गॅस सिलिंडर मिळाले नाही. काहींनी पर्याय शोधले. मात्र, त्याला देखील मर्यादा आहेत. या व्यवसायांच्या माध्यमातून सुमारे १२ ते १५ हजार आचारी, कामगारांना रोजगार मिळतो. लग्नसराई, धार्मिक उत्सवाच्या काळात व्यावसायिक सिलिंडरअभावी मोठी अडचण झाली.

व्यावयायिक सिलिंडरच्या पुरवठ्यात राज्यातील पुरवठा विभागाने अत्यावश्यक सेवांसाठी प्राधान्यक्रम ठरवला. त्यामध्ये गेले तीन आठवडे हॉटेल व्यवसायाचा समावेश नव्हता. त्या कारणाने हॉटेलला व्यावसायिक सिलिंडरचा पुरवठा बंद झाला. दरम्यान, हॉटेल व्यावसायिक संघटनांनी वारंवार सरकारकडे सिलिंडर पुरवठा करण्याची मागणी केली. त्यानंतर पुरवठा विभागाच्या सहसचिवांनी २ एप्रिलला राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या पत्रात प्राधान्यक्रमाचे क्षेत्र व वाटपाची टक्केवारी कळवली आहे. त्यामध्ये हॉटेल, धाबे, उपहारगृहे यांना २० टक्के पुरवठा करण्याचे निर्देश दिले आहेत.

## चेहऱ्यामागचा चेहरा! वाघाला भुलवण्यासाठी लढवली अशी भन्नाट कल्पना

**विदर्भ केसरी। भंडारा :**



जिल्ह्यात साकोली, पवनी, तुमसर तालुक्यात वाघांची प्रचंड दहशत आहे. वाघ केव्हाही हल्ला करत असल्याने गावात राहणंही अवघड झालं. मात्र वाघाचे हल्ले परतवून लावण्यासाठी पवनी वनपरिक्षेत्रात काही अधिकाऱ्यांनी अशी काही भन्नाट युक्ती शोधून काढली की, वाघही आता कन्फ्युज झाले आहेत. वाघांना भुलविण्यासाठी वन विभागाने केलेल्या प्रयोग यशस्वीही झाला. चेहऱ्यामागे चेहरा अर्थात मुखवटा लावण्याची वनविभागाची ही शक्कल केवळ कल्पकता नसून मानव-वन्यजीव संघर्षाच्या घटना कमी करण्यासाठी उचललेले अत्यंत यशस्वी पाऊल आहे.

मागील काही दिवसांत साकोली तालुक्यात वाघाच्या हल्ल्यात दोन जणांचा मृत्यू तर एक महिला गंभीर जखमी झाल्यानंतर मानव वन्यजीव संघर्ष पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. वाघाचे हल्ले रोखण्यासाठी किंवा ते परतवून लावण्यासाठी काय करता येईल यावर विचार मंथन सुरू झाले असतानाच भंडारा जिल्ह्यातील "पवनी मॉडेल" आता चर्चेला आले आहे. वनी वनपरिक्षेत्रात वाघाच्या हल्ल्यांमुळे जीवितहानी होत असताना वनविभागाने एक अनोखी शक्कल लढवली आहे. माणसाच्या डोक्याच्या मागील बाजूस मानवी मुखवटा लावण्याची प्रथा! वाघ साधारणपणे मागून हल्ला करतो हे ओळखून, गावकरी डोक्याच्या मागच्या बाजूला माणसाच्या चेहऱ्याचे मुखवटे लावून फिरत आहेत. यामुळे वाघाला समोरून आणि मागून दोन्ही बाजूंनी माणूस आपल्याकडेच पाहत असल्याचा भास होतो.




दैनिक विदर्भ केसरी RNI MAHMAR/2022/88796 हे वृत्तपत्र प्रकाशक अमोल नरेश कंटाळे यांच्याव्दारे दैनिक विदर्भ केसरी कार्यालय शमीम आझाद शाळा दर्यापूर. जि. अमरावती कार्यालय, येथून मालक अमोल नरेश कंटाळे यांच्या वतीने प्रकाशित केलेले असून संपादक अमोल कंटाळे यांनी संपादीत केलेले आहे. आणि मुद्रक साई दर्पण प्रकाशन यांनी सिव्हिल लाइन दर्यापूर ता. दर्यापूर जिल्हा अमरावती पिन 444803 येथे मुद्रीत केलेले आहे. (या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहीरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीशः संपर्क साधुन खात्री करुन पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास दर्यापूर न्यायालया अंतर्गत)

Printed by-Amol Naresh kantale (printer name) and published by- Amol Naresh kantale (Owner name) and printed at-SAI DARPAN PRAKASHAN civil line, Daryapur Tq-Daryapur dist, Amravati Maharashtra 444803 (name & complete address of printing press)and published at-shamim Azad school Rajputpura, Daryapur, dist, Amravati, Maharashtara-444803 complete place of publication-Editor-Amol Naresh Kantale(Editor name ) tital code. MAHMAR51049 l, Email:-vidarbhkesari21@gmail.com Mob-9975532291,9096945629

दैनिक
# विदर्भ केसरी
विदर्भाचा मानबिंदू



GOOD MORNING
# कॉटनसिटी
!! मना-मनात दारा-दारात फक्त विदर्भ केसरी!!

## जिल्हास्तरीय लोकशाही दिन सोमवारी

**विदर्भ केसरी। यवतमाळ** लोकांच्या तक्रारी निकाली काढण्याच्यादृष्टीने मार्च महिन्याच्या पहिल्या सोमवारी दि. 6 एप्रिल 2026 रोजी सकाळी 10 वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथे जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. या लोकशाही दिनामध्ये न्याय प्रविष्ट प्रकरणे, राजस्व अपिल प्रकरणे, सेवाविषयक, आस्थापना विषयक बाबी, विहीत नमुन्यात नसणारे व आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती न जोडलेले अर्ज, अंतिम उत्तर दिलेले आहे असे अर्ज स्वीकारण्यात येणार नाही. तक्रार, निवेदन वैयक्तिक स्वरुपाची नसावी. महिन्यातील तिसऱ्या सोमवारी तालुका स्तरावर लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते.

## महत्त्वाचे

### पत्नीच्या हत्येतील आरोपीला न्यायालयाकडून जामीन मंजूर
### ॲड.आमीन मेमन यांची सफल पैरवी

**विदर्भ केसरी। अचलपूर:**



धारणी पोलीस स्टेशन अंतर्गत पत्नीची काठीने मारून हत्या करणाऱ्या आरोपी रतन मुरले याला जिल्हा व सत्र न्यायालय अचलपूर यांनी जामीन मंजूर केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी रतन मुरले याने घरगुती वादातून स्वतःच्या पत्नीच्या डोक्यावर काठीने प्रहार करून तिची हत्या केली होती. याप्रकरणी आरोपीच्या मुलाने दिलेल्या तक्रारीवरून धारणी पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केली होती. तपासादरम्यान पोलिसांनी गुन्ह्यात वापरलेली काठी जप्त करून प्रत्यक्षदर्शींचे जबाब नोंदवले आणि न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते. या प्रकरणात आरोपीच्या वतीने ॲड. मोहम्मद आमीन मेमन यांनी जामिनासाठी अर्ज केला होता. त्यांनी न्यायालयात मांडलेला प्रभावी युक्तिवाद आणि कायदेशीर बाजू विचारात घेऊन जिल्हा व सत्र न्यायालयाने आरोपीचा जामीन अर्ज मंजूर केला. या प्रकरणात ॲड. मोहम्मद आमीन मेमन यांची यशस्वी पैरवी महत्त्वाची ठरली.

### शिवणी येथे १०८ हनुमान चालीसा पठण व ११ कुंडी यज्ञ हवन संपन्न

**विदर्भ केसरी। मोहदा प्रति :-विरेंद्र चव्हाण**

मोहदा :-घाटंजी,तालुक्यातील शिवणी येथे श्री हनुमान जन्मोत्सवानिमित्त



शिवणी गावात भव्य धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी अखंड १०८ वेळा हनुमान चालीसा पठण तसेच ११ कुंडी यज्ञ हवन विधिवत पार पडले.कार्यक्रमाची सुरुवात विधिवत पूजन व मंत्रोच्चाराने करण्यात आली. गावातील श्रद्धाळू पुरुषांनी मोठ्या संख्येने सहभागी होत हनुमान चालीसाचे सुमारे १३ तास अखंड पठण केले. संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने आणि आध्यात्मिक ऊर्जेने भारावून गेला होता। यज्ञ हवनामध्ये विद्वान ब्राह्मणांनी वैदिक मंत्रोच्चारांसह आहुती दिल्या, ज्यामुळे वातावरण शुद्ध व सकारात्मक ऊर्जेने परिपूर्ण झाले. या धार्मिक कार्यक्रमाचा मुख्य उद्देश गावामध्ये सुख-शांती, समृद्धी व आपसी बंधुभाव वृद्धिंगत करणे हा होता।कार्यक्रमाच्या शेवटी महाप्रसादाचे वितरण करण्यात आले, ज्यामध्ये सर्व ग्रामस्थांनी उत्साहाने सहभाग घेतला।या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी गावातील सर्व कार्यकर्ते व ग्रामस्थांचे विशेष सहकार्य लाभले. उपस्थितांनी अशा धार्मिक कार्यक्रमांमुळे समाजात एकता व सकारात्मकता वाढीस लागते, असे मत व्यक्त केले.

### मुंबईच्या हृदयस्थानी घुमला 'व्यसनमुक्ती'चा नारा; 'विठाई' प्रतिष्ठानचा स्तुत्य उपक्रम!

**विदर्भ केसरी। मुंबई प्रतिनिधी**

मुंबईची जीवनवाहिनी आणि ऐतिहासिक वारसा असलेल्या छत्रपती



शिवाजी महाराज टर्मिनस (CSMT) परिसरामध्ये आज एका आगळ्या वेगळ्या जनआंदोलनाची प्रचिती आली. रिसोड येथील विठाई मायनॉरिटी बहुउद्देशीय प्रतिष्ठानच्या वतीने २ एप्रिल २०२६ रोजी मुंबईत भव्य 'व्यसनमुक्ती जनजागृती' अभियान राबविण्यात आले. रेल्वे स्थानका समोरून जाणाऱ्या हजारो प्रवाशांचे लक्ष वेधून घेत,व्यसनांच्या विळख्यातून समाजाला बाहेर काढण्यासाठी या संस्थेने पुढाकार घेतला.आजच्या धावपळीच्या युगात तरुणाई मोठ्या प्रमाणावर अमली पदार्थ आणि व्यसनाधीनते कडे वळत आहे.ही बाब समाजवि घातक असून भविष्यातील पिढी बरबाद करणारी आहे. याच पार्श्वभूमीवर,विठाई प्रतिष्ठानने मुंबई सारख्या गजबजलेल्या शहरात थेट रेल्वे स्थानका समोरच जनजागृती करण्याचा निर्णय घेतला. यावेळी हातामध्ये प्रबोधनात्मक फलक घेऊन संस्थेच्या वतीने व्यसनांचे दुष्परिणाम उपस्थितांना समजावून सांगण्यात आले. या मोहिमेचे नेतृत्व संस्थेचे अध्यक्ष प्रदिप खंडारे यांनी केले.यावेळी बोलताना ते म्हणाले की,"व्यसन हे केवळ व्यक्तीलाच नाही,तर संपूर्ण कुटुंबाला उद्ध्वस्त करते. समाज सुदृढ करायचा असेल, तर व्यसनमुक्तीची सुरुवात स्वतःपासून आणि आजपासूनच करायला हवी."

यावेळी संस्थेचे सक्रिय सदस्य जियाउर खान आणि सदानंद गायकवाड यांनीही प्रवाशांशी संवाद साधला.व्यसन सोडण्यासाठी लागणारे मनोबल आणि सामाजिक पाठिंब्याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले.या उपक्रमात मुंबईतील स्थानिक नागरिक आणि रेल्वे प्रवाशांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. रिसोडसारख्या शहरातून येऊन मुंबईत सामाजिक बांधिलकी जपणारी ही मोहीम सर्वत्र चर्चेचा विषय ठरली आहे.

# दात्तृत्वाचे समाधान म्हणजे जीवन जगण्याची अनुभूती : डॉ. वानखडे

**विदर्भ केसरी। पुसद प्रतिनिधी विजय निखाते**



दात्तृत्व म्हणजे फक्त पैसा किंवा वस्तू देणे नव्हे, ती मनाची उदारता व दुसऱ्यांच्या गरजेत स्वतःला पाहण्याची दृष्टी होय, एखाद्या गरजू विद्यार्थ्यांच्या अडचणीच्या प्रसंगी आत्मसन्मान न दुखविता त्यांच्या हातात पडलेली मदत व थकलेल्या मनाला फक्त सहानुभूतींच्या शब्दांचा आधार, एक दिशादर्शक यशस्वी जीवनाचे सुरुवात ठरते ,असे मत डॉ.अविनाश वानखडे, प्राचार्य बाबासाहेब नाईक अभियांत्रिकी महाविद्यालय पुसद यांनी महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांच्या व समाजातील दानशूर व्यक्तींनी केलेल्या मदतीचे वाटप समारंभात व्यक्त केले.

संस्थेतून उत्तीर्ण झाल्यावर 40 वर्षां नंतरही माजी विद्यार्थ्यांचे आपल्या महाविद्यालया विषयी असलेले नाते अद्यापही अतूट असल्याचे हे त्यांनी दाखवून दिले. याप्रसंगी 60 गुणवंत व गरजू विद्यार्थ्यांना एकूण सात लाख 24 हजाराची रक्कम गरजेनुसार विभागून देण्यात आली. यावेळी लाभवंत विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील समाधानाचे भाव व डोळ्यातील तरळता त्यांच्या मनातलं सारं काही सांगून गेले. ह्या विद्यार्थ्यांनी माजी विद्यार्थ्यांप्रती कृतज्ञता व्यक्त केली .दात्तृत्व म्हणजे फक्त देण्याची कृती नसून ती मनात निर्माण होणारी शांतता आहे. संत तुकारामांनी म्हटल्याप्रमाणे "देणे घेणे दोन्ही घडे, तर धन्य तो गृहस्थ" देणारा आणि घेणारा दोघेही समृद्ध होतात व समाजाशी जोडलेली नाळ अधिक घट्ट करतात, असेही ते पुढे म्हणाले. याप्रसंगी डॉ. अभय गायकवाड, सचिव माजी विद्यार्थी संघटना, प्रा. रुचिर गोडबोले, विभागप्रमुख सायन्स अँड हुमानिटी, डॉ. सुरेश असोले विभाग प्रमुख संगणक व विज्ञान, प्रा. प्रदीप दुधाट प्रोफेसर इन्चार्ज स्टुडन्ट अफेयर्स व डॉ. दीपक भालेकर उपस्थित होते. सरतेशेवटी डॉ. अविनाश वानखडे यांनी दान देणाऱ्या माजी विद्यार्थ्यांचे व समाजातील दानशूर व्यक्तीप्रति कृतज्ञता व्यक्त करून त्यांचे आभार मानले . या सामाजिक कार्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री जय नाईक यांनी सर्वांचे अभिनंदन केले.

# शुध्द पाण्याचा गोरखधंदा

**विदर्भ केसरी। यवतमाळ :**



जिल्ह्यात सध्या बनावट पिण्याच्या पाण्याच्या बाटल्यांची विक्री मोठ्या प्रमाणात सुरू असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. कमी किमतीत उपलब्ध असलेल्या या बाटल्यांमुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

बाजारात विक्रीस असलेल्या अनेक पाण्याच्या बाटल्यांवर उत्पादन दिनांक (Manufacturing Date) व एक्सपायरी डेट स्पष्टपणे नमूद नसल्याचे दिसून येत आहे. काही प्रकरणांमध्ये ही माहिती अपूर्ण किंवा खोटी असल्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच, योग्य लेबलिंगचा अभाव असल्याने पाण्याची गुणवत्ता आणि सुरक्षितता तपासणे कठीण झाले आहे.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, "फक्त तहान भागली पाहिजे" या मानसिकतेचा गैरफायदा घेत काही विक्रेते बनावट पाणी विक्री करत आहेत. यामुळे दूषित पाणी पिण्याचा धोका वाढून आरोग्याच्या गंभीर समस्या उद्भवू शकतात. यापूर्वी देशातील विविध भागांमध्ये अशा प्रकारच्या कारवाया उघडकीस आल्या असून, संबंधित यंत्रणांनी मोठ्या प्रमाणावर बनावट पाणी जप्त केले होते. अन्न सुरक्षा विभागानेही पॅकेज्ड पिण्याच्या पाण्याला 'हाय-रिस्क' श्रेणीत समाविष्ट केले आहे. पाणी खरेदी करताना बाटलीवरील लेबल नीट तपासा FSSAI नोंदणी क्रमांक असल्याची खात्री करा उत्पादन व एक्सपायरी तारीख स्पष्ट आहे का ते पाहा बाटलीची सील तुटलेली नाही याची खात्री करा अत्यंत कमी किमतीत मिळणारे पाणी खरेदी करणे टाळा बनावट पाणी विक्रेत्यांवर कारवाई कधी होणार? तपासणी यंत्रणा किती सक्रिय आहे? नागरिकांच्या आरोग्याची जबाबदारी कोण घेणार? यवतमाळ जिल्ह्यात वाढत असलेल्या या बोगस पाणी विक्रीच्या प्रकारामुळे नागरिकांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे संबंधित प्रशासनाने तातडीने तपासणी मोहीम राबवून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

# अतिक्रमणावरून वाद अन् अडथळा

## (सोशल मीडियावर धमकी देण्याचा व्हिडिओ व्हायरल)

**विदर्भ केसरी। हिंगणा:-**

हिंगणा नगर पंचायत परिसरात अतिक्रमण हटविण्याच्या कारवाईदरम्यान मोठा वाद निर्माण झाल्याची घटना समोर आली आहे. शिवसेना (ठाकरे गट) चे नगरसेवक विष्णू कोल्हे यांनी नगर पंचायतच्या पथकाच्या कारवाईत अडथळा आणल्याचा आरोप करण्यात आला आहे. संबंधित घटनेचा व्हिडिओ सध्या प्रसार माध्यमांमध्ये मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून, यामुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

याच प्रकरणात बातमी प्रकाशित करणारे पत्रकार प्रा.सतीश भालेराव यांना देखील धमकी दिल्याचा गंभीर आरोप आहे. इतकेच नव्हे तर पोलिस विभागाशीही उग्र भाषेत बोलून "अतिक्रमण हटवू देणार नाही" असा इशारा दिल्याचे समोर आले आहे. या घटनेनंतर प्रा. भालेराव यांनी संबंधित प्रकरणाची माहिती हिंगणा पोलीस निरीक्षक, एमआयडीसी एसीपी, डीसीपी झोन १ आणि नागपूर पोलीस आयुक्त यांच्यापर्यंत गेलेली आहे.

दरम्यान, या संपूर्ण प्रकरणाची माहिती शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनाही देण्यात आली आहे. तसेच नगर पंचायतचे मुख्याधिकारी धनंजय सरनाईक यांनाही याबाबत अवगत करण्यात आले असून, त्यांनी यासंदर्भात पोलिस विभागाकडे अधिकृत तक्रार दाखल करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले आहे. सध्या या प्रकरणाकडे नागरिकांचे आणि प्रशासनाचे लक्ष लागले असून, पुढे काय कारवाई होते याकडे सर्वांचे लक्ष आहे.

### कारवाई करण्याची मागणी

**■ प्रा.भालेराव यांनी नगरसेवक विष्णू कोल्हे यांच्यावर ॲट्रॉसिटी अंतर्गत तथा पत्रकार संरक्षण अधिनियम 2017 अंतर्गत नोंदवण्याची तक्रार हिंगणा पोलीस स्टेशनला दिलेली आहे. भालेराव म्हणाले की 2020 ला एमआयडीसी पोलीस स्टेशनला ज्याप्रकारे भालेराव यांना जीवघेणा हल्ला झाला होता व जीवे मारण्याचा प्रयत्न झाला होता त्याच प्रकारे विष्णू कोल्हे यांनी ते पण त्याच सहकार यांचे नातेवाईक असल्याने भालेराव यांची ॲट्रॉसिटी ची केस एव्हिडन्सवर येत्या 16 एप्रिल ला नागपूर स्पेशल कोर्टात आहे.कोल्हे यांच्या योग्य ती कारवाई न झाल्यास ऑल इंडिया पँथर सेना व महाराष्ट्रातील पत्रकार संघटना या प्रकरणावर गप्प बसणार नाही असा इशारा देण्यात आला आहे.**

# कत्तलखान्यावर पोलिसांचा छापा.

## ५ गोवंशाची सुटका, एकावर गुन्हा दाखल.

**विदर्भ केसरी। मुर्तिजापूर**



अकोला जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या 'ऑपरेशन प्रहार' अंतर्गत मुर्तिजापूर शहर पोलिसांनी एका अवैध कत्तलखान्यावर धाड टाकून मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत सुमारे २ लाख ४५ हजार रुपये किमतीच्या ५ गोवंशाची (बैल) सुटका करण्यात आली असून, एका आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मुर्तिजापूर शहरातील 'मोहम्मदिया प्लॉट' भागात एका खाजगी गोठ्यामध्ये गोवंशाची अवैध कत्तल करण्यासाठी जनावरे बांधून ठेवल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या आदेशानुसार, पोलिसांनी या माहितीची खातरजमा करून संबंधित ठिकाणी छापा टाकला. पोलिसांची कारवाई व जप्त मुद्देमाल पोलिसांनी घटनास्थळी पाहणी केली असता, तिथे कत्तलीच्या उद्देशाने बेकायदेशीरपणे डांबून ठेवलेले ५ गोवंश (बैल) आढळून आले. या बैलांची अंदाजे किंमत २,४५,००० रुपये इतकी आहे. पोलिसांनी सर्व जनावरांची सुटका करून त्यांना सुरक्षिततेसाठी 'श्री पुंडलिक महाराज गोरक्षण संस्था' येथे हलवले आहे.

### ■ आरोपीवर गुन्हा दाखल

या प्रकरणी पोलिसांनी मुशीर अहमद जमीर अहमद वय ४५ वर्षे, रा. कसाबपुरा, जुनी वस्ती, मूर्तिजापूर याच्याविरुद्ध महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ (सुधारणा २०१५) च्या कलम ५, ५ (ब), ९, ९ (अ) नुसार गुन्हा दाखल केला आहे.

ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक चंद्रकांत रेड्डी , आणि उपविभागीय पोलीस अधिकारी वैशाली मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कारवाईत पोलीस निरीक्षक अजित जाधव, पोउपनि आशिष शिंदे, गणेश सूर्यवंशी आणि त्यांच्या पथकातील इतर कर्मचाऱ्यांचा समावेश होता. पुढील तपास पोउपनि आशिष शिंदे करत आहेत.

# एचपीव्ही लसीकरणासाठी पात्र मुली सरसावल्या.

**विदर्भ केसरी। मानोरा:--**



किशोरवयीन मुलींचे भविष्यात कर्करोगापासून बचाव व्हावे यासाठी शासनामार्फत उपलब्ध करून दिल्या जात असलेली एचपीव्ही लसीकरणासाठी आता पात्र मुली सरसावल्या असून ग्रामीण रुग्णालयात अशा मुलींचे लसीकरण केल्या जात आहे. ग्रामीण रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. राजसिंह पवार यांच्या मार्गदर्शनात सदरील लस आरोग्य प्रशासना कडून ०९ ते १४ वर्षे वयोगटातील मुलींना दिल्या जात आहे. भारतातील महिलांच्या मृत्यू प्रमुख कारण बनणाऱ्या गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाला मुली ज्यावेळी नऊ ते चौदा वर्षे वयोगटाच्या असतात त्याचवेळी ही लस दिली गेल्यास जीवघेणा कर्करोगाच्या आजारापासून बचाव होण्याचे प्रमाण ९० % पेक्षा अधिक असल्याचे जागतिक आरोग्य संघटनेच्या संशोधनाअंती स्पष्ट झाल्याचे डॉ. पवार यांनी सांगितले आहे. विवाहनंतर मुलींच्या प्रजनन क्षमतेवर उपरोक्त लसीमुळे कुठलेही विपरीत परिणाम होत नसून हा एक निव्वळ गैरसमज असल्याचे सुद्धा या लसी संदर्भात प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आलेले असल्याने नऊ ते १४ वर्षे वयोगटातील सर्व मुलींना ही सुरक्षित लस देणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन ग्रामीण रुग्णालय प्रशासनाकडून कळविण्यात आले आहे.

# सुट्टीच्या दिवशी मुरूम उत्खनन परवान्याचा 'शुभमुहूर्त' चर्चेत!

**विदर्भ केसरी। कुणाल गायकवाड**



एकीकडे अवैध उत्खननाविरोधात कडक कारवाईचे दावे केले जात असताना, दुसरीकडे महसूल विभागाच्या संशयास्पद कारभारामुळे 'मुरूम माफिया' आणि प्रशासनाचे साटेलोटे तर नाही ना? असा खळबळजनक प्रश्न आता उपस्थित होत आहे. वडोली येथील सर्वे क्रमांक १९१ मधून मुरूम उत्खनन करण्यासाठी दिलेली परवानगी सध्या संपूर्ण तालुक्यात चर्चेचा आणि वादाचा विषय ठरली आहे.

विशेष म्हणजे, आज 'गुड फ्रायडे' निमित्त शासकीय सुट्टी असतानाच या उ त्खनन परवान्याची अंमलबजावणी सुरू झाल्याचे दिसत आहे. सलग तीन दिवस शासकीय सुट्ट्या असल्याने महसूल विभागाचे कोणतेही नियंत्रण किंवा मोजमाप असणार नाही. याच संधीचा फायदा घेत रॉयल्टीच्या नावाखाली हजारो ब्रास मुरूम बेसुमारपणे ओरबाडला जाण्याची भीती व्यक्त होत आहे. सुट्टीच्या दिवसापासूनच परवाना सुरू होण्यामागे प्रशासनाचा नेमका हेतू काय, की हा 'माफिया'धार्जिणा निर्णय आहे? अशा चर्चांना उधाण आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, वडोली येथील सर्वे क्रमांक १९१ मधून इंद्रपाल धु डसे यांच्या नावाने ही परवानगी का ढण्यात आली आहे. धुडसे हे कृषी उ त्पन्न बाजार समितीचे सभापती असल्याने, त्यांनी आपल्या पदाचा गैरवापर करून महसूल अधिकाऱ्यांवर दबाव टाकला आणि जाणीवपूर्वक सुट्टीच्या काळात ही परवानगी मिळवली असल्याची चर्चा परिसरात रंगली आहे.

सामान्य माणसाला साध्या कामासाठी कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागतात, मात्र 'बड्या' लोकांसाठी सुट्टीच्या दिवशीही प्रशासनाचे दरवाजे उघडे असतात का? असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत.

**■ "रॉयल्टी केवळ नावाला आणि उत्खनन मात्र अफाट, असा हा प्रकार असून शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडवण्याचा हा घाट घातला जात आहे." वृत्तपत्रांमधून सातत्याने मुरूम माफियांच्या मनमानीच्या बातम्या येत असतानाही महसूल विभाग कुंभकर्णी झोपेत का आहे? सुट्टीच्या काळात होणाऱ्या या उत्खननावर लक्ष ठेवण्यासाठी कोणतेही भरारी पथक तैनात नसल्याने 'आओ जावो घर तुम्हारा' अशी स्थिती निर्माण झाली आहे.**

# गोदावरी अर्बनचा विक्रम: ३०७९ कोटी ठेवींचा टप्पा पार

**विदर्भ केसरी। प्रतिनिधी**



**यवतमाळ** गोदावरी अर्बनने मागील आर्थिक वर्षात नेत्रदीपक प्रगती नोंदवत ३०७९ कोटी रुपयांच्या ठेवींचा महत्त्वपूर्ण टप्पा पार केला आहे. तसेच बँकेचा एकूण व्यवसाय ५५५५ कोटी रुपयांपर्यंत पोहोचला असून सहकार क्षेत्रात ही एक ऐतिहासिक कामगिरी मानली जात आहे.या यशाबद्दल सर्व स्तरातून संस्थेचे कौतुक होत आहे.

अध्यक्ष राजश्री पाटील यांनी सांगितले की, बँकिंग क्षेत्रात आर्थिक वर्षाच्या शेवटचा आठवडा म्हणजे ट्वेंटी-ट्वेंटी सामन्यासारखा थरार अनुभवायला मिळतो.गेले आर्थिक वर्ष सर्वच सहकार क्षेत्राला आव्हानात्मक असतानाही संस्थेने ठेवी वाढीसोबतच नियमित कर्जफेड करणारे उत्कृष्ट कर्जदार निर्माण करण्यावर भर दिला."ज्या गतीने आपण काम करत आहोत,त्या गतीने येणारे वर्ष अधिक यशस्वी ठरेल," असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. हे यश ग्राहकांचा विश्वास आणि अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या समर्पित कार्यामुळेच शक्य झाल्याचे त्यांनी नमूद केले.

व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर यांनी प्रास्ताविकात सांगितले की,गोदावरी अर्बन दिवसागणिक सहकार क्षेत्रात नवे विक्रम प्रस्थापित करत आहे. संस्थेने प्रगत तंत्रज्ञानाचा अवलंब करत 'सेंट्रल हब'च्या माध्यमातून फेसलेस पद्धतीने कर्ज वितरण सुरू केले आहे. कर्ज मंजुरीपूर्वी कागदपत्रांची काटेकोर तपासणी केली जाते. "व्यवसाय आणि ग्राहकसंख्या वाढत असताना जबाबदाऱ्याही वाढत आहेत. त्यासाठी कार्य कुशल मनुष्यबळ बळ व असलेल्यासाठी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित केले जाते. संचालक प्रा. सुरेश कटकमवार यांनीही हे आर्थिक वर्ष संस्थेसाठी अभिमानास्पद ठरल्याचे सांगितले.ठरवलेली सर्व आर्थिक उद्दिष्टे यशस्वीरित्या पूर्ण झाली असून पुढील काळातही संस्थेची प्रगती अधिक वेगाने होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

दरम्यान, रुद्र राजश्री हेमंत पाटील यांनी अमेरिकेतील न्यूयॉर्क येथील सेक्रेड हार्ट युनिव्हर्सिटीमधून 'मास्टर ऑफ सायन्स इन फायनान्स अँड इन्व्हेस्टमेंट मॅनेजमेंट' हा अभ्यासक्रम विशेष प्रावीण्यासह पूर्ण केला आहे. सध्या ते लॉजिस्टिक क्षेत्राशी संबंधित कंपनीत कार्यरत असून नुकतेच मायदेशी परतल्याच्या निमित्ताने संस्थेच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला.यावेळी त्यांनी आपले अनुभवही मांडले. आभार प्रदर्शन करताना उपसर व्यवस्थापक सुरेखा दवे यांनी संस्थेच्या पहिल्या आर्थिक वर्षाच्या आठवणींना उजाळा देत आजवर केलेल्या प्रगतीचा अभिमानाने उल्लेख करीत सर्वांचे आभार मानले.

या यशाबद्दल संस्थापक अध्यक्ष नामदार हेमंत पाटील यांनी अध्यक्ष राजश्री पाटील, व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर, संचालक मंडळ, विदर्भाचे विशेष योगदान देणारे उपसरव्यवस्थापक रवि इंगळे सर , ग्राहक, ठेवीदार व सभासदांचे अभिनंदन केले. यावेळी अध्यक्ष राजश्री पाटील, व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर, सचिव अँड. रविंद्र रगटे, संचालक प्रा. सुरेश कटकमवार, रुद्र पाटील, वैधानिक लेखा परीक्षक जीवन लाभशेटवार,लेखा परीक्षक अली अजगर हुसेन, उपमहा व्यवस्थापक सुरेखा दवे, उप सरव्यवस्थापक विजय शिरमेवार,विपणन अधिकारी महेश केंद्रे, अधिकारी आनंद संगावार,डेप्युटी मॅनेजर प्रशांत कदम यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# युवकाचा संशयास्पद मृत्यू

**विदर्भ केसरी। पांढरकवडा :**

दिल्ली येथे रेस्टॉरंट चालविणाऱ्या आणि मूळच्या केरळ राज्यातील असलेल्या एका २९ वर्षीय तरुणाचा पांढरकवडाजवळील धारणा शिवारात संशयास्पद मृत्यू झाला आहे. रोहित चंद्रन रा. श्रीवराहम, जि. तिरुवनंतपुरम, केरळ असे मृतकाचे नाव असून, तो आपल्या मारुती सुझुकी जिम्नी कारने (केएल ०१ सीवाय ९६४१) दिल्लीहून केरळला जात होता.

मिळालेल्या माहितीनुसार, रोहितने हॉटेल मॅनेजमेंटचा कोर्स केला होता आणि तो दिल्लीत व्यवसाय करायचा. १ एप्रिल रोजी त्याने आपण कारने गावी येत असल्याचे आपल्या कुटुंबीयांना कळवले होते. २ एप्रिल रोजी दुपारी १.३० वाजेच्या सुमारास पांढरकवडा जवळील धारणा गावातील साई सुमन पेट्रोल पंपाच्या बाजूला तो मृतावस्थेत आढळून आला. त्याच्या मृतदेहाजवळ शिलाजीतसारख्या पदार्थाचा डबा सापडला असून, त्याची कार पंपासमोर उभी होती. या घटनेची माहिती पांढरकवडा पोलिसांनी मृताच्या नातेवाईकांना दिल्यानंतर, त्याचा मोठा भाऊ राहुल चंद्रन नायर (सॉफ्टवेअर इंजिनिअर) व इतर नातेवाईक केरळवरून पांढरकवड्यात दाखल झाले आहेत. रोहितचा मृत्यू हृदयविकाराच्या झटक्याने झाला असावा, असा अंदाज त्याच्या भावाने वर्तविला आहे. पांढरकवडा पोलिसांनी याप्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक रघुपती करत आहेत. मृतदेहाचे शवविच्छेदन झाल्यानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे.

## उसने दिलेल्या पैशावरुन तरुणाला मारहाण

दिग्रस: येथे उसणे दिलेले १५,००० रुपये परत मागितल्याच्या कारणावरून एका तरुणाला लोखंडी फायटरने मारहाण केल्याची घटना घडली आहे. फिर्यादी सुमित विनोद राठोड यांनी आरोपी केतन विजय जाधव याला पैसे उधार दिले होते. १ एप्रिल रोजी रात्री समुद्रा वाईन्स जवळ पैशांची मागणी केली असता, आरोपींनी संगनमत करून सुमितच्या डोळ्यात बोटे घातली आणि 'रामनवमीच्या रॅलीत मला का ढकलले' असे म्हणून वाद घातला. आरोपींनी लोखंडी फायटरने डोक्यावर वार करून आणि लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी दिग्रस पोलिसांनी गुन्हा नोंदवला आहे.

**महत्त्वाचे**



## अनसिंग येथे हजरत मोहम्मद हनीफ मस्तान सैलानी सरकार यांचा उर्स सोहळा उत्साहात

**▸विदर्भ केसरी। अनसिंग (प्रतिनिधी):**

येथील दरबार-ए-सैलानी अनसिंग शरीफ येथे हजरत मोहम्मद हनीफ मस्तान रहेमान सैलानी सरकार (रह. अलैह) यांचा ११ वा वार्षिक उर्स सोहळा २९ मार्च ते २ एप्रिल २०२६ या कालावधीत मोठ्या भक्तिभावात आणि उत्साहात संपन्न झाला. पाच दिवस चाललेल्या या सोहळ्यात हिंदू-मुस्लिम बांधवांनी मोठ्या संख्येने हजेरी लावत सामाजिक सलोख्याचे दर्शन घडवले. उर्सची सुरुवात २९ मार्च रोजी परचम कुशाई आणि कुराण ख्वानीने झाली. ३० मार्च रोजी रात्री आयोजित मेहफिल-ए-समा मध्ये कव्वालीच्या सुरांनी भाविक मंत्रमुग्ध झाले, त्यानंतर *'शाही गुस्ल'*चा विधी पार पडला. ३१ मार्च रोजी निघालेल्या शाही संदलने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. दुपारी जोहरच्या नमाजनंतर खानकाह मधून संदल निघून दादा मस्तान येथे चादर पेश करण्यात आली, तर रात्री इशाच्या नमाजनंतर दर्गा शरीफमध्ये पारंपरिक पद्धतीने 'शाही संदल' अर्पण करण्यात आले. सोहळ्याच्या चौथ्या दिवशी, १ एप्रिल रोजी पुन्हा मेहफिल-ए-समाचा कार्यक्रम पार पडला. २ एप्रिल रोजी सकाळी १०:३० वाजता 'कुल शरीफ' व 'दुआ-ए-खैर' करण्यात आली. यावेळी उपस्थित हजारो भाविकांनी देशामध्ये शांतता, प्रगती आणि सुख-समृद्धी नांदो, अशी प्रार्थना केली. यासह पाचही दिवस भाविकांसाठी लंगर (महाप्रसाद) चे चोख नियोजन करण्यात आले होते.

"हा सोहळा केवळ धार्मिक उत्सव नसून हिंदू-मुस्लिम ऐक्याचा मोठा संदेश देणारा उपक्रम आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही सर्वधर्मीय भाविकांनी मोठ्या श्रद्धेने यात सहभाग नोंदवला."

— हजरत मोहम्मद हनीफ मस्तान रहेमान सैलानी ट्रस्ट, अनसिंग समितीचे परिश्रम हा सोहळा यशस्वी करण्यासाठी ट्रस्टचे मोहम्मद अशफाक यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व 'आशिक-ए-सैलानी' कमिटीचे सदस्य, पदाधिकारी आणि अनसिंग परिसरातील स्थानिक ग्रामस्थांनी अहोरात्र परिश्रम घेतले. उर्सच्या सांगतेनंतर भाविकांनी अत्यंत तृप्त भावनेने आपापल्या गावी प्रस्थान केले.

## वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वार जखमी

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**

: येथील लोहारा पोलीस ठाणे अंतर्गत अपघाताची एक घटना समोर आली आहे. २५ मार्च २०२६ रोजी संध्याकाळी ७:०० वाजताच्या सुमारास फिर्यादी सौ. रंजना हरीष कोरडे यांचे पती, हरीष पुंडलीक कोरडे, हे त्यांच्या दुचाकीने घरगुती सामान आणण्यासाठी मार्केटला जात होते. नायरा पेट्रोल पंपासमोर आरोपी संजय चौधरी याने आपल्या ताब्यातील चारचाकी वाहन भरधाव वेगाने आणि निष्काळजीपणे चालवून दुचाकीला जोराची धडक दिली. या भीषण अपघातात हरीष कोरडे यांच्या डोक्याला आणि छातीला गंभीर दुखापत झाली आहे. याप्रकरणी पोलिसांनी वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# वाटमारी करणारे चौघे जेरबंद

**▸विदर्भ केसरी। प्रतिनिधी**



**यवतमाळ** : अडीचशे क्विंटल तुरी भरलेला ट्रक लुटणाऱ्या टोळीचा पोलिसांनी अवघ्या आठवडाभरात छडा लावला. या प्रकरणात लोहारा पोलिसांनी थेट वाशिम जिल्ह्यात धडक देत ३ एप्रिलला एकंदर चार आरोपींना अटक केली आहे. तसेच २३४ क्विंटल तुरीचे पोतेही ताब्यात घेण्यात यश मिळविले आहे.

ट्रक लुटल्याची ही घटना २६ मार्च रोजी रात्री ९.३० वाजताच्या सुमारास यवतमाळच्या एमआयडीसी परिसरात घडली होती. या प्रकरणात कलीमोद्दीन ख्वाजा मिराज उद्दीन (२६) रा. नुर नगर दारव्हा रोड कारंजा जि. वाशिम, मोहम्मद अक्रम मोहम्मद सलीम बाळापुरे, (३५) रा. कोळी ता. कारंजा जि. वाशिम, सलीमोद्दीन कलीमोद्दीन (३९) रा. हातगाव ता. मूर्तीजापूर जि. अकोला, ईम्रान हसन अब्दुल हसन (२५) रा. नुर नगर दारव्हा रोड, कारंजा जि. वाशिम अशी पोलिसांनी अटक केलेल्या चार आरोपींची नावे आहेत. २६ मार्चच्या रात्री लोहारा एमआयडीसी येथील शासकीय गोडावून समोर शुभम सतीश मोरे (१९) रा. कवठळ ता. मंगळूरपीर जि. वाशीम हा ट्रक (एमएच ३४ बीझेड २७१४) घेऊन हजर होता. त्यावेळी दोन अनोळखी इसम त्याच्याजवळ आले व त्याच्या गळ्यावर चाकू ठेवून त्याचे हातपाय, तोंड, डोळ्याला पट्टी बांधून ट्रक घेऊन पळून गेले. या ट्रकमध्ये २५० क्विंटल तुरीचे ५०० पोते होते. एकूण २२ लाख रूपयांचा मुद्देमाल पळवून नेल्याची फिर्याद प्रमोद भाऊराव नवरंगे (४५) रा. पांढरकवडा यांनी लोहारा पोलिस ठाण्यात दाखल केली होती. त्यावरुन कलम ३०९(४),३(५) भारतीय न्याय संहितेनुसार गुन्हा नोंद करुन तपास सुरू करण्यात आला होता. सदर गुन्ह्यात गोपनीय माहिती मिळताच लोहारा पोलिसांच्या पथकाने तांत्रिक तपास करुन कारंजा येथे सापळा रचून कारवाई केली. यात कलीमोद्दीन ख्वाजा मिराज उद्दीन, मोहम्मद अक्रम मोहम्मद सलीम बाळापुरे रा. कोळी ता. कारंजा, सलीमोद्दीन कलीमोद्दीन यांना ताब्यात घेतले. कसून चौकशी केली असता त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. त्यावरुन आरोपी सलीमोद्दीन कलीमोद्दीन याच्याकडून कारंजा, मूर्तीजापूर, दर्यापूर येथून एकूण २३४ क्विंटल तुरीचे पोते (किंमत २० लाख ५९ हजार २००) हस्तगत करण्यात लोहारा पोलीसांना यश प्राप्त झाले आहे. सदर गुन्ह्यात चार आरोपींना अटक करण्यात आली असून अधिक तपास सुरु आहे. ही कामगिरी जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, सहाय्यक पोलीस अधिक्षक रॉबीन बन्सल, उपविभागीय पोलीस अधिकारी दिनेश बैसाने यांच्या मार्गदर्शनाखाली लोहारा पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रोहीत चौधरी, पोलिस उपनिरीक्षक गजानन अजमीर, अमोल अन्नेरवार, पवन चिरडे, बबलू पठाण, प्रशांत राठोड, नकुल रोडे, कल्पेश रामटेके, रितेश मस्के, विजय कबले यांनी केली.

## वाहनातच युवकाचा संशयास्पद मृत्यू


**▸विदर्भ केसरी। पांढरकवडा :**



दिल्ली येथे रेस्टॉरंट चालविणाऱ्या आणि मूळच्या केरळ राज्यातील असलेल्या एका २९ वर्षीय तरुणाचा पांढरकवडाजवळील धारणा शिवारात संशयास्पद मृत्यू झाला आहे. रोहित चंद्रन रा. श्रीवराहम, जि. तिरुवनंतपुरम, केरळ असे मृतकाचे नाव असून, तो आपल्या मारुती सुझुकी जिम्नी कारने (केएल ०१ सीवाय ९६४१) दिल्लीहून केरळला जात होता. मिळालेल्या माहितीनुसार, रोहितने हॉटेल मॅनेजमेंटचा कोर्स केला होता आणि तो दिल्लीत व्यवसाय करायचा. १ एप्रिल रोजी त्याने आपण कारने गावी येत असल्याचे आपल्या कुटुंबीयांना कळवले होते. २ एप्रिल रोजी दुपारी १.३० वाजेच्या सुमारास पांढरकवडा जवळील धारणा गावातील साई सुमन पेट्रोल पंपाच्या बाजूला तो मृतावस्थेत आढळून आला. त्याच्या मृतदेहाजवळ शिलाजीतसारख्या पदार्थाचा डबा सापडला असून, त्याची कार पंपासमोर उभी होती. या घटनेची माहिती पांढरकवडा पोलिसांनी मृताच्या नातेवाईकांना दिल्यानंतर, त्याचा मोठा भाऊ राहुल चंद्रन नायर (सॉफ्टवेअर इंजिनिअर) व इतर नातेवाईक केरळवरून पांढरकवड्यात दाखल झाले आहेत. रोहितचा मृत्यू हृदयविकाराच्या झटक्याने झाला असावा, असा अंदाज त्याच्या भावाने वर्तविला आहे. पांढरकवडा पोलिसांनी याप्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक रघुपती करत आहेत. मृतदेहाचे शवविच्छेदन झाल्यानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे.

## राज्यात यंदा पाणीसाठा समाधानकारक

**▸विदर्भ केसरी। मुंबई :**




राज्यातील पाणीसाठा मागील वर्षाच्या तुलनेत समाधानकारक असला तरी यंदा एल निनोच्या प्रभावामुळे पाऊसपाण्यावर विपरित परिणाम होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. पावसाने ओढ दिल्यास टंचाई किंवा दुष्काळसदृश उपाययोजनांची तयारी सुरू आहे.

मागील काही वर्षांपासून महाराष्ट्राने समाधानकारक पाऊस अनुभवला. यंदा मात्र जागतिक तापमानवाढीमुळे अल निनोचा प्रभाव जाणविण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. त्यामुळे महाराष्ट्रात मान्सूनचा पाऊस विलंबाने बरसू शकतो. तसेच पावसाचे प्रमाण लक्षणीयरीत्या घटण्याची शक्यता आहे. खासगी हवामान संस्थेने तसा अंदाज वर्तविल्याने चिंतेत भर पडली आहे.

सध्या राज्यातील पाणीसाठा समाधानकारक आहे. मात्र, खासगी संस्थांच्या अंदाजानुसार पाऊस लांबल्यास शहरी आणि ग्रामीण भागाला जाणवणाऱ्या पाणीटंचाईच्या झळांची तीव्रता वाढू शकते. अशा परिस्थितीत पाण्याचे नियोजन करावे लागू शकते. मात्र, भारतीय हवामान खात्याकडून हवामानाचा पूर्वानुमान जाहीर झाल्यानंतरच त्याला मूर्त स्वरूप मिळू शकणार असल्याचे मंत्रालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले. राज्य सरकारने मात्र संभाव्य स्थिती लक्षात घेत दीर्घकालीन उपायांसाठी तरतूद केलेली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः अर्थसंकल्प सादर करताना एल निनोचा प्रभाव पावसावर होऊ शकतो, अशी शक्यता वर्तविली. आपल्या सर्वांसाठी ही गंभीर बाब असल्याचे सुचवतानाच दीर्घकालीन उपायांचा सूतोवाच केला होता. जलयुक्त शिवारच्या माध्यमातून जलसंधारणाच्या कामाला गती दिली जाईल, पाणी आणि चारा टंचाईवर मात करण्यासाठी आवश्यक पावले उचलली जातील, तसेच जागतिक बँकेच्या सहाय्याने सांडपाण्यावर प्रक्रिया करून त्याच्या पुनर्वापराच्या प्रकल्पांची घोषणा करत त्यासाठी 5 हजार 860 कोटींची घोषणाही करण्यात आली. दरम्यान, सध्या राज्यातील पाणीसाठी समाधानकारक आहे.

राज्यातील सर्व प्रकल्पांतील उपयुक्त पाणीसाठी तुलनेत जास्त आहे. गेल्यावर्षी एप्रिल महिन्याच्या सुरुवातीला राज्यातील उपयुक्त पाणीसाठी 46.24 टक्के इतकाच होता. यंदा मात्र हेच प्रमाण 51.18 टक्के इतके आहे. तर, राज्याच्या विविध भागांतील टँकरची संख्याही गेल्यावर्षीच्या तुलनेत कमी आहे.

## गॅस वितरणात भेदभाव? शहराच्या तुलनेत गावांना कमी सिलेंडर



**▸विदर्भ केसरी।**

**अशा आहेत मागण्या**

- **शहर आणि ग्रामीण भागासाठी समान गॅस वितरण नियम लागू करा. पुरवठा व्यवस्थेत पारदर्शकता आणि जबाबदारी निश्चित करा. ब्लॅक मार्केटिंग आणि गैरवापरावर कडक कारवाई करा. गॅस वितरणातील भेदभाव आणि अनियमिततेमुळे ग्रामीण असंतोष वाढत आहे. वेळेत सुधारणा न झाल्यास हा मुद्दा आंदोलनाचे रूप घेऊ शकतो.**

**सिलिंडरचा 'स्टॉक संपला'**

- **सामान्य ग्राहकांना 'स्टॉक संपला' म्हणून परत पाठवले जाते, पण तेच सिलिंडर हॉटेल आणि ढाब्यांना पाठीमागून पुरविले जातात. व्यावसायिक सिलिंडर गॅस महाग असल्याने हॉटेलचालक घरगुती सिलिंडरचा वापर करत आहेत. प्रशासनाने ग्रामीण भागात वाहतूक आणि वितरण प्रक्रियेला अधिक वेळ लागतो, असे सांगत असले तरी, हा युक्तिवाद ग्रामीण नागरिक आणि जनप्रतिनिधींना पटत नाही.**

तुमसर तालुक्यातील गोबरवाही येथील ग्रामीण भागात सिलिंडर गॅस वितरणाबाबत शहर आणि गावांमधील कथित भेदभावाचा मुद्दा सध्या तापला आहे. ग्रामीण नागरिकांमध्ये वाढत्या असंतोषामुळे जनप्रतिनिधींनीही या व्यवस्थेवर प्रश्न उपस्थित केले आहेत.

सध्याच्या नियमांनुसार, २५ शहरी ग्राहकांना दिवसांनंतर गॅस बुकिंग करता येते, तर ग्रामीण भागासाठी ही मर्यादा ४५ दिवस आहे. बुकिंगनंतरही ग्रामीण ग्राहकांना १५ ते २० दिवस अतिरिक्त प्रतीक्षा करावी लागते, ज्यामुळे अडचणी वाढल्या आहेत.

गावांमध्ये संयुक्त कुटुंबे जास्त असल्याने एक सिलिंडर ४५ दिवस चालवणे अशक्य आहे. परिणामी, महागाई दराने खुल्या बाजारातून किंवा ब्लॅक मार्केटमधून गॅस खरेदी करावा लागतो. जळाऊ लाकडे मिळणेही कठीण आहे. जि.प. सदस्य कृष्णकांत बघेल यांनी गॅस एजन्सींवर गंभीर आरोप केले. त्यांनी अनेक एजंसी जाणीवपूर्वक पुरवठ्यात विलंब करतात.

## विधवा, विधुर, घटस्फोटीतांसाठी विशेष परिचय मेळाव्याचे आयोजन.

**▸विदर्भ केसरी। मानोरा:--**

तालुक्यासह राज्यातील विविध भागात निवासाला असलेल्या बंजारा समाजातील कुटुंबांमध्ये असलेल्या विधवा, विधुर,घटस्फोटीत यांचे संसार उभे राहावे व समाजातील कुटुंब व्यवस्था मजबूत व्हावी या उदात्त हेतूने समाजसेवक दत्ता राठोड यांच्या वतीने नांदेड शहरामध्ये उपरोक्त मेळाव्याचे आयोजन १२ एप्रिल रोजी करण्यात आले आहे.

तांड्यांमध्ये वस्ती करून राहणाऱ्या बंजारा समाजाने आधुनिक काळात शिक्षणाची कास धरल्याने विकासाच्या मुख्य प्रवाहात सामील होत असताना तांड्यातील सहजीवन आणि एकत्रित कुटुंब व्यवस्थे पासून हा समाज आता काही अंशी दुरावताना दिसत आहे ज्याचे विपरीत परिणाम विवाह संस्थेला आधुनिक काळात घटस्फोटाच्या रूपाने सामोरे जावे लागत असल्याचे प्रकर्षाने पुढे येत आहे. विविध कारणांनी जोडीदारांपैकी एक मृत्युमुखी पडल्याने विधवा अथवा विधूर झालेल्या व्यक्तींना योग्य जोडीदार मिळविण्यासाठी अनंत अडचणींचा सामना कुटुंबीयांना करावा लागतो हीच परिस्थिती काही कारणाने घटस्फोट झालेल्या व्यक्तीप्रसंगी सुद्धा उद्भवत असते. शिक्षणामुळे आणि रोजगार प्राप्त करण्यासाठी अनेक वर्षे खर्ची पडत असल्याने मुला मुलींचे वाढते वय यामुळे सुद्धा जोडीदार मिळवण्यात त्रास सहन करावे लागत असणाऱ्या कुटुंबीयांसाठी बंजारा समाजातील विविध सामाजिक संघटनांद्वारा विवाह परिचय मेळाव्याचे आयोजन दरवर्षी राज्यामध्ये आयोजित केले जाते मात्र विधवा,विधुर आणि घटस्फोटीतांसाठी विशेष परिचय मेळाव्याचे आयोजन नांदेड येथील छत्रपती चौकातील हॉटेल ग्रँड मध्ये १२ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आले असून यात सहभागी होण्याचे आवाहन आयोजक दत्ता राठोड (मो. 8055888855) यांच्यावतीने करण्यात आले आहे.

# सरपंच रामेश्वर डोमा खेडेकर यांचे अपील फेटाळले

**देवळी ग्रामपंचायत प्रकरणात शासनाचा अंतिम आदेश, चौकशी व कारवाईला वेग**

**▸विदर्भ केसरी। प्रतिनिधी - राजहंस शेंडे | कुही**





कुही तालुक्यातील देवळी (खुर्द/कला) ग्रामपंचायत प्रकरणात राज्य शासनाने निर्णायक भूमिका घेत सरपंच रामेश्वर डोमा खेडेकर यांचे अपील फेटाळून लावले असून, अपर आयुक्त, नागपूर विभाग यांनी दिलेला पूर्वीचा आदेश कायम ठेवला आहे. या निर्णयामुळे प्रकरणातील पुढील प्रशासकीय कारवाईला वेग येण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम 1958 च्या कलम 39(3) अंतर्गत दाखल या अपीलावर मंत्री, ग्रामविकास व पंचायत राज यांच्या न्यायालयात सविस्तर सुनावणी घेण्यात आली. दोन्ही बाजूंचे युक्तिवाद, सादर कागदपत्रे व संबंधित अधिकाऱ्यांचे अहवाल यांचा बारकाईने विचार करून शासनाने दि. ०९ जुलै २०२४ रोजी अंतिम आदेश पारित केला.

यापूर्वी अपर आयुक्त, नागपूर विभाग यांनी दि. ०४ नोव्हेंबर २०२३ रोजी दिलेल्या आदेशाविरोधात सरपंच खेडेकर यांनी अपील दाखल केले होते. मात्र शासनाने उपलब्ध पुरावे व नोंदींचा सखोल अभ्यास करून हे अपील नामंजूर करत मूळ आदेश कायम ठेवला.

प्रकरणात परवानगीशिवाय मुरूम उत्खनन, नियमबाह्य कंत्राट वाटप, तांत्रिक मंजुरीशिवाय विकासकामे, तसेच शासकीय निधीच्या वापरामध्ये अनियमितता झाल्याचे गंभीर आरोप करण्यात आले होते. काही प्रकरणांमध्ये कामांतून मिळालेली रक्कम ग्रामपंचायतीच्या खात्यात जमा न झाल्याचाही मुद्दा समोर आला आहे.

- **दरम्यान, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नागपूर यांच्या अहवालात काही तथ्यात्मक विसंगती आढळून आल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे प्रकरणाची सखोल तपासणी आवश्यक असल्याचे स्पष्ट झाले होते.**
- **शासनाने अखेर अपील फेटाळून अपर आयुक्तांचा आदेश कायम ठेवत संबंधित अधिकाऱ्यांना आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत. या निर्णयामुळे देवळी ग्रामपंचायतीतील प्रशासकीय घडामोडींना नवे वळण मिळाले असून, पुढील काळात या प्रकरणात आणखी ठोस कारवाई होण्याची शक्यता आहे.**

तसेच जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत मंजूर निधीच्या खर्चात पारदर्शकतेचा अभाव असल्याचे निरीक्षण नोंदविण्यात आले आहे. काही कामांसाठी निविदा प्रक्रिया न पाळता थेट कामे देण्यात आल्याचा आरोप असून, त्यामुळे ग्रामपंचायतीच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

दुसरीकडे, सरपंच रामेश्वर डोमा खेडेकर यांनी सर्व आरोप फेटाळून लावत, ग्रामपंचायतीच्या सूचनाफलकावर माहिती प्रसिद्ध करून हरकती मागवूनच निर्णय घेतल्याचा दावा केला. कोणताही आर्थिक गैरव्यवहार किंवा शासनाच्या निधीचे नुकसान झाले नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# वृत्तपत्रांना 150% दरवाढ द्या; पत्रकार संरक्षण कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करा.

### – 'व्हॉईस ऑफ मीडिया' मालेगाव तालुक्याच्या वतीने निवेदन...!

**▸विदर्भ केसरी। मालेगाव**

मालेगाव :- राज्यातील वृत्तपत्र उद्योगाला आर्थिक दिलासा देण्यासाठी जाहिरात दरात 150 टक्के वाढ करावी तसेच पत्रकारांवरील वाढत्या अन्यायाच्या घटनांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी 'व्हॉईस ऑफ मीडिया'च्या वतीने करण्यात आली आहे. या मागण्यांसाठी १ एप्रिल रोजी मालेगाव तहसील कार्यालय तहसीलदारांमार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन पाठविण्यात आले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, 2019 पासून कागद, प्रिंटिंग साहित्य, वीज, केमिकल्स व मनुष्यबळाच्या खर्चात सुमारे 150 टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे. मात्र शासनाच्या जाहिरात दरात वाढ न झाल्याने लघु व मध्यम वृत्तपत्रांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. त्यामुळे जाहिरात दरवाढीसह ई-टेंडर जाहिराती पूर्ण स्वरूपात प्रसिद्ध करणे, किमान जाहिरात आकार 200 चौ. से. निश्चित करणे, जाहिरात देयके 30 दिवसांत अदा करणे व सर्व वृत्तपत्रांना समान संधी देणे, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत.

याशिवाय, शासकीय जाहिराती माहिती खात्यामार्फतच वितरित कराव्यात, प्रलंबित तपासण्या तातडीने पूर्ण कराव्यात व 25 वर्षे पूर्ण केलेल्या वृत्तपत्रांना नैसर्गिक दरवाढ लागू करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, राज्यात पत्रकारांवर होत असलेल्या हल्ले, खोटे गुन्हे व धमक्यांच्या घटनांचा तीव्र निषेध नोंदवित पत्रकार संरक्षण कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याची मागणी करण्यात आली.

या आंदोलनात 'व्हॉईस ऑफ मीडिया'चे जिल्हाध्यक्ष भागवत



मापारी, तालुकाध्यक्ष अजय चोथमल, अनिल बळी, आनंता कुटे, संगिता कदम, श्रीकृष्ण खिल्लारे, सुनील इंगळे, देविदास सोनुने, मिना चव्हाण, संदीप इंगोले, सविता बळी, आशाताई तायडे, संतोष गिरडे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एसटी प्रशासनाचा मनमानी कारभार!

### वाशिम-अनसिंग-जयपूर मार्गावरील बस बंद; प्रवाशांचे प्रचंड हाल

**▸विदर्भ केसरी। वाशिम/अनसिंग:**

वाशिम आगारातून सुटणारी वाशिम-पार्डी आसरा-उमरा शमशुद्दीन-उमरा कापसे-जवळा-अनसिंग-वाई-वारला-झोंडगा-जयपूर-ढिल्ली या महत्त्वपूर्ण ग्रामीण मार्गावरील बस सेवा मागील अनेक दिवसांपासून बंद आहे. या एका बसवर अनेक गावांचा संपर्क अवलंबून असताना, बस अचानक बंद झाल्याने प्रवाशांचे हाल होत आहेत. या प्रकारामुळे संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे

सदर मार्ग हा अनेक मोठ्या गावांना जोडणारा मुख्य मार्ग आहे. उमरा, जवळा, अनसिंग आणि जयपूर परिसरातील शेकडो विद्यार्थी शिक्षणासाठी वाशिम किंवा अनसिंग येथे येतात. बस सेवा बंद असल्याने विद्यार्थ्यांना खाजगी वाहनांचा आधार घ्यावा लागत आहे, ज्यासाठी त्यांना जास्तीचे पैसे मोजावे लागत आहेत. खिशात सवलतीचा 'पास' असूनही विद्यार्थ्यांना पायपीट करावी लागत असल्याने पालकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

प्रवाशांची संख्या पुरेशी असतानाही ही बस का बंद केली? असा सवाल ग्रामस्थ विचारत आहेत. धक्कादायक बाब म्हणजे, बस सेवा बंद असताना या मार्गावर अवैध खाजगी वाहतुकीचा सुळसुळाट वाढला आहे. "संबंधित अधिकारी वर्ग या अवैध वाहतूकदारांच्या 'देवाण-घेवाणी'च्या विषयात जास्त रस घेत असून, त्यामुळेच एसटी बस जाणीवपूर्वक बंद ठेवली जात आहे का?" अशी चर्चा आता प्रवाशांमध्ये रंगू लागली आहे. लोकप्रतिनिधींनी लक्ष देण्याची मागणी अनसिंग आणि परिसरातील गावांसाठी ही बस जीवनवाहिनी आहे.

ग्रामीण भागातील जनतेला सोयीसुविधा देण्याचे दावे प्रशासन करत असले, तरी प्रत्यक्षात मात्र सामान्य प्रवाशांना वाऱ्यावर सोडण्यात आले आहे. संबंधित आगार व्यवस्थापकांनी या मार्गाची गांभीर्याने दखल घेऊन बस सेवा त्वरित सुरू करावी, अन्यथा परिसरातील संतप्त नागरिक आंदोलनाच्या पवित्र्यात आहेत

- **बसअभावी आम्हाला खाजगी वाहनांनी प्रवास करावा लागतो. अधिकाऱ्यांनी केवळ कार्यालयात न बसता ग्रामीण भागातील प्रवाशांच्या समस्या समजून घ्याव्यात**

» Selected

### निमगाव येथील नाल्या ऊपसा न केल्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात



सावली :- तालुक्यातील निमगाव ग्राम पंचायत येथे गावातील नाल्यांमध्ये बहुतांश ठिकाणी गाळ साचून नाल्यांमधील पाणी थांबुन सदर नाल्यांमध्ये मच्छर पैदास केंद्र होत असल्याचे निदर्शनास येत आहे. सदर नाल्यांच्या सफाई करीता गावातील नागरिकांकडून सण २०२४ पासुन तर आजपर्यंत तिन वेळा ग्रामपंचायत कार्यालयात अर्ज देऊनही सदर ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचे दिसून येत आहे. त्याचप्रमाणे सदर निमगाव ग्रामपंचायत मधील नाल्यांमध्ये वारंवार पाणी साचून असल्याने गावामध्ये मलेरीया, डेंग्यू सारख्या घातक आजारांची लागण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच आमच्या प्रतीनिधिंना हि माहिती कळताच सदर ग्रामपंचायत अधिकाऱ्यांसोबत दुरध्वनी द्वारे संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांच्याकडून कुठलाही प्रतिसाद मिळाला नसल्याने, त्यांच्याकडून ग्राम पंचायत विकास कामांमध्ये हलगर्जीपणा करीत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे प्रशासकीय वरीष्ठ अधिकाऱ्यांनी निमगाव गावामध्ये विजीट देऊन गावातील समस्या जाणून हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर योग्य कारवाई करुन गावामध्ये कसल्याही आजारांची लागण होण्याची वेळ येणार नाही. अशी उपाययोजना करावी असे गावकऱ्यांकडून बोलले जात आहे.

---

### येरदळमी येथील बंद सौर नळ त्वरित दुरुस्त करण्याची मागणी-CPI



एटापल्ली: ग्रामपंचायत गट्टा अंतर्गत येत असलेल्या येरदळमी गावातील श्री. रामचंद्र लेकामी यांच्या घरासमोरील सौर ऊर्जेवर आधारित दुहेरी नळ मागील काही महिन्यांपासून बंद अवस्थेत आहे. यामुळे गावातील आदिवासी नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे. या समस्येबाबत गावातील आदिवासी नागरिकांनी कॉ. सचिन मोतकुरवार यांच्याकडे धाव घेऊन मदत मागितली. नागरिकांची कैफियत जाणून घेतल्यानंतर हा नळ तातडीने दुरुस्त करावा, अशी मागणी भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे (भाकपा) जिल्हा सहसचिव कॉ. सचिन मोतकुरवार यांनी प्रशासनाकडे केली आहे. सध्या उन्हाळा सुरू असून तापमानाचा पारा दिवसेंदिवस वाढत आहे. अशा परिस्थितीत गावातील पाण्याचा मुख्य स्त्रोत असलेला हा सौर नळ बंद असल्याने नागरिकांचे पिण्याच्या पाण्यासाठी प्रचंड हाल होत आहेत. येथील महिला व नागरिकांना पाण्यासाठी दूरवर पायपीट करावी लागत असून, वाढत्या उन्हामुळे पाणी टंचाईची समस्या अधिकच गंभीर बनली आहे. याबाबत बोलताना कॉ. सचिन मोतकुरवार म्हणाले की, "येरदळमी येथील नागरिक आधीच अनेक समस्यांचा सामना करत आहेत, त्यात भर म्हणून गेल्या काही महिन्यांपासून हा नळ बंद आहे. गावातील नागरिकांनी या अडचणीबाबत मला माहिती देऊन सहकार्याची विनंती केली आहे. उन्हाळ्याची तीव्रता पाहता प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष देणे गरजेचे आहे. रामचंद्र लेकामी यांच्या घरासमोरील या नळाची तांत्रिक दुरुस्ती करून तो लवकरात लवकर कार्यान्वित करावा, जेणेकरून येथील आदिवासी बांधवांना दिलासा मिळेल. जोपर्यंत या नळाची दुरुस्ती होऊन येथील पाणी प्रश्न सुटणार नाही, तोपर्यंत आम्ही याचा सतत पाठपुरावा करत राहू."

## कुणाला गंडवले, कुणाचे सर्वस्व लुटले :

# जिल्ह्यात तीन वर्षांत १० भोंदू पकडले!

### नागरिकांची फसवणूक : जादुटोणाविरोधी कायदा असूनही मांत्रिकांचा सुळसुळाट..!

विदर्भ केसरी। विनोद सेलोटे

गडचिरोली :- विज्ञानाच्या युगात माणूस चंद्रावर पोहोचला असला, तरी गडचिरोलीसारख्या वनव्याप्त जिल्ह्यात आजही अंधश्रद्धेचे जाळे घट्ट आहे. महाराष्ट्रात जादुटोणाविरोधी कायदा २०१३ लागू होऊन दशक उलटले, तरी भोंदूबाबा आणि मांत्रिकांकडून होणारी सर्वसामान्यांची फसवणूक थांबलेली नाही. गेल्या तीन वर्षात जिल्ह्यात जवळपास १० भोंदुबाबांना पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. मात्र, तरीही छुप्या पद्धतीने चालणारा हा काळा बाजार अनेकांचे आयुष्य उद्ध्वस्त करत आहे.

अपत्यप्राप्ती, गुप्तधन आणि संकटातून मुक्ती मिळवून देण्याचे आमिष दाखवून हे भोंदू लोकांच्या अज्ञानाचा फायदा घेत आहेत. यात केवळ अशिक्षित नव्हे, तर उच्चशिक्षित लोकही मोठ्या प्रमाणात बळी पडत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. फसवणूक झालेल्यांपैकी ५० टक्के लोक समाजात बदनामी होईल, या भीतीने पोलिसांकडे जात नाहीत. विशेषतः महिलांच्या बाबतीत ही टक्केवारी अधिक आहे. दैवी शक्ती, कोपाची भीती दाखवून अब्रूवर घाला सर्वात संतापजनक प्रकार म्हणजे महिलांचे होणारे शारीरिक शोषण, दैवी शक्तीचा कोप होईल किंवा घरातील पुरुषाचा जीव जाईल, अशी भीती घालून महिलांवर अत्याचार केले जातात. उपचाराच्या नावाखाली किंवा विधीच्या बहाण्याने महिलांच्या अब्रूवर घाला घातला जातो. अनेकदा भीतीपोटी या महिला कोणाकडेही वाच्यता करत



नाहीत. बळी पडणाऱ्यांमध्ये उच्चशिक्षित अधिक अंधश्रद्धा केवळ ग्रामीण किंवा अशिक्षित भागातच आहे, हा समज आता खोटा ठरत आहे. मनातील असुरक्षिततेची भावना उच्चशिक्षितांनाही या मांत्रिकांच्या दारात लोटांगण घालायला लावत आहे. नागरिक तक्रार न केल्यामुळे अशा भोंदूंचे धाडस वाढत असल्याचे दिसून येते. गुप्तधनाचा मोह अन् अपत्यप्राप्तीचा सोस एआय इमेज भोंदुबाबांकडे जाण्यामागे प्रामुख्याने तीन कारणे दिसून येतात. परंतु गुन्हे सिद्ध करण्यात अडचणी येतात तरीसुद्धा गडचिरोली जिल्ह्यात गेल्या तीन वर्षांत जवळपास १० भोंदुबाबांवर कारवाई करण्यात आली आहे. यात स्थानिक मांत्रिकांपासून ते परराज्यातून येणाऱ्या भोंदूंचा समावेश आहे.

जादुटोणाविरोधी कायद्यांतर्गत त्यांच्यावर गुन्हे दाखल झाले असले, तरी पुराव्याअभावी किंवा पीडितांच्या माघारीमुळे हे गुन्हे सिद्ध होण्यात अडचणी येतात. ६६ नागरिकांमधील अंधश्रद्धा दूर करण्याचा प्रयत्न आमच्या सामाजिक संघटनेमार्फत सातत्याने केला जात आहे. मात्र, केवळ सामाजिक संघटनांच्या प्रयत्नांनी हे थांबणार नाही. तर शासनानेही जनजागृतीची जबाबदारी अधिक प्रभावीपणे उचलण्याची गरज आहे, तरच अशा भोंदूगिरीला लगाम बसेल. विलास निंबोरकर, राज्य सरचिटनीस, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती. जादुटोण्यासाठी नागरिकांचे लाखो रुपये बुडाले अंगात देव येण्याचे नाटक करणे किंवा करणी बाधा दूर करण्याच्या नावाखाली हे मांत्रिक पूजेसाठी महागड्या वस्तूंची मागणी करतात. सुरुवातीला काही हजार रुपयांपासून सुरू झालेला हा प्रवास लाखो रुपयांच्या लुटीपर्यंत पोहोचतो. अनेक पीडितांनी आपली शेती आणि दागिने विकून या भोंदूंचे खिसे भरल्याच्या घटना जिल्ह्यात घडल्या आहेत. या घटनांचे प्रमाण वाढत आहे.

## जात पडताळणी प्रमाणपत्रासाठी लाच मागणारे दोन कंत्राटी जेरबंद

विदर्भ केसरी। गडचिरोली


जिल्ह्यात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (ACB) पुन्हा एकदा धडक कारवाई करत शासकीय कामासाठी लाच मागणाऱ्या दोन कंत्राटी कर्मचाऱ्यांना रंगेहात पकडले आहे. जात पडताळणी प्रमाणपत्र मिळवून देण्यासाठी लाच मागितल्याच्या प्रकरणात ही कारवाई करण्यात आली असून, प्रशासनातील भ्रष्टाचाराचा पुन्हा एकदा पर्दाफाश झाला आहे. प्राप्त माहितीनुसार, ४८ वर्षीय तक्रारदाराने आपल्या मुलीच्या जात पडताळणी प्रमाणपत्रासाठी ३१ मार्च २०२६ रोजी ऑनलाइन अर्ज सादर केला होता. त्यानंतर १ एप्रिल रोजी तो जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती कार्यालय, गडचिरोली येथे चौकशीसाठी गेला असता, तेथील प्रकल्प सहाय्यक (कंत्राटी) मंगेश मनोहर आंबोरकर (वय ४२, रा. शिवाजी नगर, रामपुरी वॉर्ड) यांनी प्रमाणपत्र काढून देण्यासाठी ५,००० रुपयांची लाच मागितल्याचे समोर आले. या मागणीमुळे त्रस्त झालेल्या तक्रारदाराने २ एप्रिल रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली. त्यानुसार ACB पथकाने तत्काळ पडताळणी कारवाई केली. या पडताळणीदरम्यान कार्यालय सहाय्यक (कंत्राटी) दिनेश कवडू सिडाम (वय ३८, रा. बजरंग नगर, गडचिरोली) यांनी आंबोरकर यांच्या वतीने २,००० रुपयांची मागणी केल्याचे स्पष्ट झाले. पुढे चर्चेनंतर दोन्ही आरोपींनी १,००० रुपयांमध्ये व्यवहार करण्यास तयारी दर्शविली. यानंतर ACBने सापळा रचून २ एप्रिल रोजीच संबंधित कार्यालयात कारवाई केली. आरोपी मंगेश आंबोरकर यांच्या अंगझडतीत लाच रक्कम जप्त करण्यात आली आहे. कारवाईदरम्यान आरोपींकडील मोबाईल फोनही जप्त करण्यात आले असून, आंबोरकर यांच्याकडून रेडमी १२ आणि सिडाम यांच्याकडून मोटो जी ४५ कंपनीचे मोबाईल ताब्यात घेण्यात आले आहेत. तसेच आरोपींच्या निवासस्थानी झडती घेण्याची प्रक्रिया सुरू असून, अधिक तपास सुरू आहे. या प्रकरणी गडचिरोली पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अंतर्गत कलम ७ व १२ नुसार गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, पुढील कायदेशीर कारवाई केली जाणार आहे.

## मला इच्छामरणाची परवानगी द्या ; किडनी विकलेल्या शेतकऱ्याची मुख्यमंत्र्यांना आर्त विनंती

विदर्भ केसरी। विनोद सेलोटे

चंद्रपूर : जिल्ह्यातील नागभीड तालुक्यातील मिंथूर येथील शेतकरी रोशन शिवदास कुळे यांनी अवैध सावकारीच्या जाळ्यात अडकून कर्ज फेडण्यासाठी किडनी विकल्याचा धक्कादायक प्रकार समोर आल्यानंतर आता त्यांनी थेट मुख्यमंत्री यांना पत्र लिहून इच्छामरणाची परवानगी मागितली आहे. "माझी शेती बळजबरीने घेतली गेली, कुटुंब उपासमारीच्या स्थितीत आहे आणि चार महिन्यांपासून न्यायासाठी प्रशासनाच्या दारात चकरा मारत आहे.

चंद्रपूर जिल्ह्यामध्ये नागभीड तालुक्यात मिंथूर गावातील शेतकरी रोशन शिवदास कुळे यांची हृदयद्रावक कहाणी पुन्हा एकदा समोर आली आहे. अवैध सावकारीच्या विळख्यात अडकलेल्या कुळे यांनी मुख्यमंत्री यांना थेट पत्र लिहून आपल्या कुटुंबाच्या अत्यंत बिकट परिस्थितीची माहिती दिली असून, न्याय न मिळाल्यास इच्छामरणाची परवानगी देण्याची मागणी केली आहे. २ एप्रिल २०२६ रोजी पाठविलेल्या पत्रात रोशन कुळे यांनी नमूद केले आहे की, त्यांच्या प्रकरणात शासनाने काही प्रमाणात कारवाई केल्याबद्दल ते आभारी आहेत. आरोपींवर गुन्हे दाखल झाल्यामुळे न्याय मिळण्याची आशा निर्माण झाली असली, तरी प्रत्यक्षात त्यांच्या आयुष्यातील अडचणी अद्याप कायम आहेत. कुळे यांनी पत्रात म्हटले आहे की, अवैध सावकारांनी त्यांच्यावर प्रचंड दबाव टाकून त्यांची शेती बळजबरीने आपल्या नावावर करून घेतली. त्यांच्या वडिलांच्या नावे असलेली ०.४५ हेक्टर शेती सावकाराने स्वतःच्या नावावर करून घेतली, तर ०.९९ हेक्टर शेती दलालामार्फत त्यांच्या पत्नीच्या नावावर हस्तांतरित करण्यात आली. ही संपूर्ण प्रक्रिया त्यांच्या



इच्छेविरुद्ध आणि दबावाखाली झाल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

या आर्थिक संकटातून बाहेर पडण्यासाठी आणि कर्जाचा ताण कमी करण्यासाठी त्यांना जबरदस्तीने किडनी विकण्यास भाग पाडण्यात आले, असेही त्यांनी पत्रात नमूद केले आहे. सध्या ते फक्त एका किडनीवर जीवन जगत असून, त्यामुळे त्यांची प्रकृतीही खालावलेली आहे. त्यांच्या कुटुंबाची परिस्थिती अत्यंत बिकट आहे. त्यांचे वडील मानसिक आजाराने त्रस्त असून त्यांच्या पायाला अपंगत्व आहे, त्यामुळे ते चालू शकत नाहीत आणि पूर्णपणे मुलावर अवलंबून आहेत. मात्र स्वतःची प्रकृती बिघडल्याने कुळे यांना काम करणेही शक्य होत नसल्याने कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न गंभीर बनला आहे. त्यामुळे त्यांचे संपूर्ण आयुष्य अंधारात गेले असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली आहे. पत्राद्वारे रोशन कुळे यांनी शासनाकडे चार प्रमुख मागण्या केल्या आहेत.

त्यामध्ये बळजबरीने हस्तांतरित केलेली ०.४५ व ०.९९ हेक्टर शेती तात्काळ रद्द करून परत मिळवून देणे, संबंधित आरोपींची संपत्ती गोठवणे, प्रकरणातील पुढील कारवाई जलदगतीने करणे आणि कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी तातडीची आर्थिक मदत देणे या मागण्यांचा समावेश आहे. रोशन कुळे यांनी पत्राच्या शेवटी अत्यंत वेदनादायी शब्दांत, शासनाने त्यांच्या परिस्थितीची दखल घेऊन त्यांना जगण्यासाठी आधार द्यावा. अन्यथा या असह्य परिस्थितीत जगणे कठीण झाल्याने इच्छामरणाची परवानगी द्यावी,अशी आर्त मागणी त्यांनी केली आहे.

## मा.खा. डॉ. अशोकजी नेते यांचे केंद्रीय मंत्री मनोहरलाल खट्टर यांना निवेदन

विदर्भ केसरी। गडचिरोली

महाराष्ट्रातील आदिवासी व दुर्गम गडचिरोली जिल्ह्यातील नागरिकांना भेडसावणाऱ्या वीज, गृहनिर्माण व शहरी विकासाशी संबंधित गंभीर समस्यांकडे लक्ष वेधण्यासाठी आज दिल्लीत माजी खासदार तथा भाजपा अनुसुचित जनजाती मोर्चाचे राष्ट्रीय महामंत्री डॉ.अशोकजी नेते यांनी केंद्रीय मंत्री मनोहर लाल खट्टर यांच्याकडे सविस्तर निवेदन सादर केले आहे. या निवेदनात विविध योजनांची अंमलबजावणी अपुरी राहिल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना भेडसावणाऱ्या अडचणींचा उल्लेख करण्यात आला आहे. दुर्गम गावांमध्ये नियमित वीजपुरवठ्याचा अभाव असून



वारंवार होणारे वीज खंडित होणे ही गंभीर समस्या आहे. अनेक भागांत वीज पोहोचलेली नसून सौर ऊर्जा व मायक्रो-ग्रिड प्रकल्पांची अंमलबजावणी संथ गतीने होत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. योजनेअंतर्गत मंजूर घरे मोठ्या प्रमाणात अपूर्ण आहेत. लाभार्थ्यांना आवश्यक कागदपत्रे, तांत्रिक मार्गदर्शन व प्रशासकीय सहकार्याचा अभाव जाणवत आहे. आदिवासी भागात जमिनीच्या मालकीसंदर्भातील अडचणींमुळे योजना रखडत असल्याचेही निदर्शनास आणून देण्यात आले. गडचिरोली व देसाईगंज शहरांमध्ये नाली व्यवस्था, पाणीपुरवठा आणि कचरा व्यवस्थापन या मूलभूत सुविधा अपुऱ्या आहेत. AMRUT व इतर शहरी योजनांचा अपेक्षित लाभ नागरिकांपर्यंत पोहोचलेला नाही. या सर्व समस्यांवर तात्काळ प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी ठाम मागणी करण्यात आली असून, गडचिरोली जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र शासनाने विशेष लक्ष देण्याची गरज अधोरेखित करण्यात आली आहे.

## चंद्रपूर ला मिळाल्या पहिल्या महिला जिल्हाधिकारी ; वसूमना पंत यांची नियुक्ती

विदर्भ केसरी। चंद्रपूर

प्रशासनात महत्त्वपूर्ण बदल करत महाराष्ट्र शासनाने चंद्रपूर जिल्ह्याला पहिल्यांदाच महिला जिल्हाधिकारी दिले आहेत. भारतीय प्रशासकीय सेवेतील (IAS) अधिकारी वसूमना पंत यांची चंद्रपूरच्या जिल्हाधिकारीपदी नियुक्ती करण्यात आली असून, यामुळे जिल्ह्यात नवीन प्रशासकीय नेतृत्वाची सुरुवात झाली आहे. महाराष्ट्र शासनाने प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या बदल्यांच्या आदेशात महत्त्वाचा निर्णय घेत वसूमना पंत यांची जिल्ह्याच्या जिल्हाधिकारीपदी नियुक्ती केली आहे. त्या सध्या छत्रपती संभाजीनगर येथे अतिरिक्त महापालिका



आयुक्त म्हणून कार्यरत होत्या. त्यांच्या या नियुक्तीमुळे चंद्रपूरच्या इतिहासात पहिल्यांदाच महिला जिल्हाधिकारी लाभल्या आहेत.

शासनाच्या आदेशानुसार, त्यांची नियुक्ती सध्याचे चंद्रपूरचे जिल्हाधिकारी विनय गौडा यांच्या जागी करण्यात आली आहे. तर विनय गौडा यांची नियुक्ती (भा.प्र.से.) अन्य विभागात करण्यात आल्याची माहिती शासनाच्या आदेशात नमूद आहे. शासनाकडून देण्यात आलेल्या निर्देशानुसार, वसूमना पंत यांनी आपल्या सध्याच्या पदाचा कार्यभार महापालिका आयुक्तांच्या सल्ल्याने इतर अधिकाऱ्यांकडे सोपवून, त्वरित नवीन पदाचा पदभार स्वीकारण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यानुसार त्या लवकरच जिल्हाधिकारी पदाची सूत्रे हाती घेतील. दरम्यान, शासनाच्या या निर्णयामुळे चंद्रपूर जिल्ह्याच्या प्रशासनाला नवे नेतृत्व मिळणार असून विकासकामांना गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. जिल्ह्याच्या इतिहासात प्रथमच महिला अधिकारी जिल्हाधिकारी म्हणून धुरा सांभाळणार असल्याने हा निर्णय विशेष महत्त्वाचा मानला जात आहे.

## कोट्यवधींचे कुवाकोडी आरोग्य केंद्र उद्घाटनापूर्वीच 'खिळखिळे

# निकृष्ट बांधकामामुळे आदिवासींच्या जीवाशी खेळ!

विदर्भ केसरी। भामरागड

भामरागड तालुक्यातील अतिदुर्गम कुवाकोडी येथे नव्याने बांधण्यात आलेले प्राथमिक आरोग्य उपकेंद्र वादाच्या भोऱ्यात सापडले आहे. बांधकामासाठी शासनाकडून तब्बल ९० लाखांहून अधिक निधी खर्च करण्यात आला असला, तरी प्रत्यक्ष इमारत पाहता ती अत्यंत निकृष्ट दर्जाची असल्याचे समोर आले आहे. काम पूर्ण झाले असले तरी इमारतीच्या दर्जावरून कंत्राटदार आणि प्रशासनाच्या 'अर्थपूर्ण' अभयावर आता प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

**काय आहे प्रकरण?**

जिल्हा परिषद गडचिरोली अंतर्गत सन २०२३-२४ या वर्षात कुवाकोडी येथे फायबर स्ट्रक्चरच्या इमारतीचे बांधकाम मंजूर करण्यात आले होते. 'मे. भगवती बिल्डर्स, गोंदिया' या कंत्राटदाराने हे



काम पूर्ण केले असून यासाठी ९० लाख ६८ हजार ६४६ रुपयांची मोठी रक्कम खर्च करण्यात आली आहे. १५ मे २०२५ ही काम पूर्ण करण्याची मुदत होती. मात्र, इमारत उभी राहिल्यानंतर यातील कामाचा दर्जा अत्यंत सुमार असल्याचे ग्रामस्थांच्या निदर्शनास आले आहे. शासकीय निधीची उघड लूट? भामरागड सारख्या अतिमागास आणि आदिवासी बहुल भागातील नागरिकांना आरोग्य सुविधा मिळाव्यात, हा शासनाचा मुख्य उद्देश होता.

मात्र, कंत्राटदाराने आपला फायदा पाहण्यासाठी अतिशय हलक्या दर्जाचे साहित्य वापरल्याचा आरोप होत आहे. ९० लाखांच्या मानाने इमारतीची स्थिती पाहिली तर शासकीय निधीची ही उघड लूट असल्याची संतापजनक प्रतिक्रिया उमटत आहे. दोन वर्षांचा 'दोष निवारण कालावधी' (Liability Period) असताना, आता जिल्हा परिषदेचे वरिष्ठ अधिकारी या ठेकेदारावर कारवाई करून काम पुन्हा नीट करून घेणार की भ्रष्टाचारावर पांघरूण घालणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

> प्रशासनाचे 'कमिशन' आणि ठेकेदाराची 'मजा' या बांधकामावर लक्ष ठेवण्याची जबाबदारी जिल्हा परिषद (बांधकाम) उपविभाग, एटापल्ली यांच्याकडे होती. मात्र, डोळ्यांसमोर निकृष्ट काम होऊनही अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले. यात प्रशासनातील वरिष्ठ स्तरावर मोठी 'कमिशनखोरी' झाल्याची चर्चा आता संपूर्ण तालुक्यात रंगली आहे. आदिवासी भाग असल्याने इथे कोणाचेही लक्ष नसेल, या समजुतीने ठेकेदाराने आपला मनमानी कारभार रेटला आहे. "आरोग्य केंद्राची इमारत पूर्ण झाली असली तरी ती सुरक्षित वाटत नाही. ९० लाख रुपये खर्च करूनही जर असे निकृष्ट काम मिळत असेलशोषण कोण थांबवणार? याची उच्चस्तरीय चौकशी झालीच पाहिजे.
>
> **"- संतप्त ग्रामस्थ, कुवाकोडी**

## शेततळ्यात बुडून तरुणाचा मृत्यू ; परिसरात हळहळ..!

विदर्भ केसरी। आरमोरी

तालुक्यातील ठाणेगाव येथे शेततळ्यात बुडून एका तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली असून परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. प्राप्त माहितीनुसार, प्रकाश चिचचरे यांच्या शेततळ्यावर काही महिला धुणी करत असताना त्यांना पाण्यावर एक मृतदेह तरंगताना दिसला. त्यांनी ही माहिती गावातील अमोल नैताम यांना दिली. नैताम यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता, मृतदेह हा त्यांच्या मावशीचा मुलगा अतुल विलास घोडरे (वय 29, रा. ठाणेगाव) याचाच असल्याचे स्पष्ट झाले. घटनेची माहिती मिळताच आरमोरी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा करून मृतदेह



पाण्याबाहेर काढला. फिर्यादीच्या तोंडी अहवालानुसार, मृत अतुल हा दारुच्या नशेत शेततळ्यात बुडून मृत्यूमुखी पडल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली असून, मृत्यूबाबत कोणताही संशय नसल्याचे नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी पोलिसांनी मर्ग नोंद करून पुढील तपास सुरु केला असून पोलीस निरीक्षक गवते यांच्या मार्गदर्शनाखाली पोहवा प्रेमानंद लाडे यांच्याकडे तपास सोपविण्यात आला आहे.



Selected

## कृषी संजीवनीची डेडलाइन




सहा वर्षांपूर्वी सुर करण्यात आलेला नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाची (पोकरा) मुदत ३० जूनला संपत आहे. त्यासंदर्भात प्रकल्प संचालकांचे पत्र धडकल्याने राज्यातील ७८० कंत्राटी कर्मचाऱ्यांचा जीव टांगणीला लागला आहे. विदर्भ - मराठवाड्यातील १६ जिल्ह्यात प्रकल्पाची अंमलबजावणी २०१८ पासून सुरू झाली होती. या प्रकल्पाची मुदत सहा वर्षांसाठी होती. ही मुदत ३० जून २०२४ ला संपुष्टात येत आहे. प्रकल्पामार्फत उपलब्ध करून दिलेले कंत्राटी मनुष्यबळ ३० जूनपर्यंत त्यांच्या कार्यालयात उपलब्ध राहणार आहे.त्यानंतर त्यांची सेवा समाप्त होणार आहे.

# महिलांच्या स्टार्टअपसाठी नवी योजना मिळणार 25 लाखांपर्यंत अर्थसहाय्य

महिला नेतृत्वातील स्टार्टअप्सला विविध प्रकारची आव्हाने आणि अडथळ्यांना सामोरे जावे लागते असे दिसून आले आहे. या क्षेत्रातील महिलांना विशेष सहाय्याशिवाय आणि पुरेशा निधीअभावी यशस्वी होणे जिकरीचे ठरते. महिला नेतृत्वातील स्टार्टअप, शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थीनीमधून उदयास येणारे स्टार्टअप यांना सुरूवातीपासून प्रोत्साहीत करून राज्यात सुरू असणाऱ्या इन्क्युबेशन सेंटर्सच्या माध्यमातून मार्गदर्शन करणे तसेच प्रोटोटाईप बनवणे इत्यादी करीता देखील सहाय करणे आवश्यक आहे.महिला नेतृत्वातील स्टार्टअप यांना आवश्यकतेप्रमाणे अर्थसहाय्य उपलब्ध करून दिल्यास त्यांना संजिवनी मिळेल तसेच याद्वारे अन्य महिलांना देखिल रोजगार उपलब्ध होईल. महिला नेतृत्वातील स्टार्टअपमुळे स्थानिक गरजेवर आधारित व स्थानिक कच्चा माल उपलब्धतेवर आधारित स्टार्टअप विकसित होऊ शकतील. स्टार्टअप विकासाद्वारे महिलामध्ये आत्मनिर्भरता वाढवून त्यांचा स्टार्टअपच्या विकासाच्या माध्यमातून उद्योगाचा व्यासायिक दृष्टिकोण विकसीत होईल. तसेच शहरी व ग्रामीण पातळीपर्यंत देखिल स्टार्टअप परिसंस्थेच्या विकासामध्ये वाढ होईल.याकरीता महिला नेतृत्वातील स्टार्टअप यांना आर्थिक पाठबळ देण्याची आवश्यकता असून याकरीता राज्यामध्ये



"पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजना" सुरु करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. राज्यातील महिला नेतृत्वातील स्टार्टअप्सना प्रारंभीक टप्प्यावरील पाठबळ देण्यासाठी "पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजना" राज्यामध्ये राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

### योजनेचे उद्दिष्ट व स्वरूप

१) महाराष्ट्र राज्यातील महिला नेतृत्वातील स्टार्टअप्सना पाठबळ देणे.
२) राज्यातील महिला नेतृत्वातील स्टार्टअप्स व नाविन्यपूर्ण संकल्पना असलेल्या स्टार्टअप्सना व्यवसाय वृद्धीसाठी तसेच विस्तार करणेसाठी एक वेळेस अर्थ सहाय्य करणे.
३) राज्यातील महिला स्टार्टअप्सला स्वावलंबी व आत्मनिर्भर करणे.
४) देशातील सर्वाधिक महिला स्टार्टअप्स असलेले राज्य म्हणून महाराष्ट्राची ओळख निर्माण करणे.
५) स्टार्टअपच्या माध्यमातून रोजगार कमी करणे.
६) या योजनेतील एकूण तरतूदीच्या २५ टक्के इतकी रक्कम शासनाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या मागासवर्गातील महिला, आर्थिकदृष्ट्या मागास वर्गातील महिलांकरीता राखीव ठेवण्यात येईल.
७) राज्यातील महिला नेतृत्वातील प्रारंभिक टप्प्यातील स्टार्टअप्सना त्यांच्या उलाढालीनुसार किमान रू.१ लाख ते कमाल रू. २५ लाखांपर्यंत आर्थिक सहाय्य प्रदान करण्यात येईल.सदर योजना राबविण्यासाठी महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी यांना अंमलबजावणी संस्था म्हणून घोषीत करण्यात येत आहे.

# प्रधानमंत्री श्रम योगी मानधन योजना

प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजना अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना वयाच्या 60 वर्षानंतर दरमहिना 3,000/- रुपये इतकी पेन्शन रक्कम दिली जाते.
लाभार्थ्यांची पेन्शन रक्कम ही त्याच्या प्रीमियम रकमेवर अवलंबून असेल त्याने जेवढी योगदान रक्कम भरलेली आहे त्या रकमेनुसार सरकार तुमच्या खात्यात दरमहिना पैसे जमा करेल.
योजनेचा लाभ
वय वर्ष 60 पूर्ण केल्यानंतर दरमहा 3,000/- रुपये मानधन रक्कम दिली जाईल.लाभार्थी कामगारांचा मृत्यू झाल्यास त्याच्या वैवाहिक जोडीदारास योजना सुरु ठेवता येईल.लाभार्थीस स्वेच्छेने योजनेतून बाहेर पडावयाचे झाल्यास जमा केलेल्या अंशदानासह व्याजाची रक्कम परत दिली जाईल.

### आवश्यक पात्रता

मासिक उत्पन्न 15,000/- रुपयांपेक्षा कमी असणे आवश्यक आहे.
कर्मचारी राज्य बिमा निगम, भविष्य निर्वाह निधी अथवा राष्ट्रीय पेन्शन योजनेचा सभासद नसावा.
अर्जदाराने मागील 12 महिन्यांमध्ये 90 दिवसांपेक्षा जास्त दिवस बांधकाम कामगार म्हणून काम केलेले असणे आवश्यक आहे.
योजनेमध्ये असंघटीत क्षेत्रामध्ये काम करणारा वय वर्ष 18 ते 40 दरम्यानचा कामगार, मासिक उत्पन्न 15,000/- रुपये पेक्षा कमी असणारा व कर्मचारी राज्य बिमा निगम, भविष्य निर्वाह निधी अथवा राष्ट्रीय पेन्शन योजनेचा सभासद नसणारा कामगार पात्र आहेत.
18 ते 40 वयोगटातील लाभार्थीने 55/- रुपये ते 200/- रुपये पर्यंत प्रतिमाह (वयाची 60 वर्षे पूर्ण होईपर्यंत) अंशदान जमा केल्यानंतर लाभार्थीस वयाची 60 वर्ष पुर्ण केल्यानंतर दरमहा किमान 3000/- रुपये निवृत्तीवेतन देय राहिल.

# विद्यार्थी लाभाच्या योजना

### 1) शाळेतील शिकणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करणे. (शासकीय योजना)

* योजनेचे स्वरूप : मान्यताप्राप्त माध्यमिक शाळेत शिक्षण घेत असलेले अनुसूचित जाती, जमाती, विमुक्त व भटक्या जातीतील विद्यार्थ्यांना शिक्षणास अधिक प्रोत्साहन मिळण्यासाठी शिष्यवृत्ती योजना राबविली जाते. इ. ५ वी ते १० वी मधील एका वर्गातील दोन विद्यार्थ्यांना ५०% पेक्षा जास्त गुण आवश्यक.
* अर्ज कसा करावा : या योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी अर्ज करण्याची आवश्यकता नसून संबंधित शाळेने मुलांची यादी, जात, इयत्ता व गुण इत्यादी माहिती सह प्रस्ताव सादर करणे आवश्यक.
* अर्ज कोणाकडे सादर करावा ? : विद्यालयाने सदरचा प्रस्ताव समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद यांच्याकडे सादर करणे आवश्यक आहे.
* लाभाचे स्वरूप : नवीन दरानुसार इयत्ता ५ वी ते ७ वी रु. ५०/- द.म. १० महिन्यांसाठी १००/- रुपये., ८ वी ते १० वी रु. ७५/- द.म. १० महिन्यांसाठी ७५०/-

### 2) अस्वच्छ व्यवसायात काम करणाऱ्या पालकांच्या मुलांना शालान्तपूर्व शिष्यवृत्ती योजना

* योजनेचे स्वरूप : अस्वच्छ व्यवसायात काम करणाऱ्या कोणत्याही जाती/जमातींच्या मुलांना/ मुलींना इयत्ता १ ली ते १० वी मध्ये शिक्षण घेत असताना शिष्यवृत्ती दिली
* अर्ज कसा करावा? : विहित नमुन्यातील अर्ज संबंधित शाळेत मुख्याध्यापक यांच्याकडे सादर करावा.
* अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे :1)उपविभागीय अधिकारी यांनी दिलेला जातीचा दाखला.
2) उत्पन्नाचा दाखला.
* अर्ज कोणाकडे सादर करावा ? : संबंधित शाळेचे मुख्याध्यापक.
* लाभाचे स्वरूप : वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी
इयत्ता ३ री ते ८ वी रु. २००/- द.म. (१० महिन्यांकरिता)
इयत्ता ९ वी ते १० वी — रु. 240/- द. म. (१० महिन्यांकरिता)
बिगर वसतिगृहात राहणारे विद्यार्थी
इ. १ ते ५ वी रु. 25 /- द. म. (१० महिन्यांकरिता)
इ. ६ ते ८ वी रु.४०/- द. म. (१० महिन्यांकरिता)

### 3) व्यावसायिक पाठ्यक्रमाशी संलग्न असलेल्या वसतिगृहातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना निर्वाहभत्ता योजना

* योजनेचे स्वरूप : वैद्यकीय, अभियांत्रिकी, तंत्रनिकेतन, कृषी व पशुवैद्यकीय महाविद्यालयांत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी साठी ही विशेष निर्वाहभत्त्याची योजना आहे.
* अर्ज कसा करावा?
* अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे : वसतिगृहात रहात असलेबाबतचे प्रमाणपत्र
* अर्ज कोणाकडे सादर करावा ? : संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्यपालकांचे वार्षिक उत्पन्न रु. ५०,९२०/- असलेल्या भारत सरकार शिष्यवृत्तिधारक विद्यार्थ्यास ही विशेष निर्वाह भत्त्याची रक्कम रु.१००/- प्रमाणे दरमहा १० महिन्यांसाठी दिली जाते.




# कामगार कौशल्यवृद्धी योजना

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ मार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या कौशल्यवृद्धी प्रशिक्षण कार्यक्रमामुळे कामगार आणि त्यांच्या कुटुंबियांना खालीलप्रमाणे अनेक फायदे मिळू शकतील.

### कामगारांना होणारे फायदे

रोजगाराच्या संधींमध्ये वाढ होईल: कामगारांमध्ये कौशल्य वृद्धीची वाढ झाल्यास त्यांना नवीन आणि चांगल्या नोकरीच्या संधी उपलब्ध होतील.
उत्पन्नात वाढ: प्रशिक्षण प्राप्त करून कामगारांना बढती मिळू शकते किंवा कौशल्याच्या जोरावर दुसऱ्या क्षेत्रात चांगल्या पगाराची नोकरी मिळून उत्पन्नात वाढ होईल.ज्ञानाचा विकास होईल: नवीन कौशल्य प्रशिक्षण प्राप्त करून त्यांना औद्योग क्षेत्रात सध्या सुरु असलेले प्रशिक्षण प्राप्त करता येईल.
आत्मविश्वास वाढेल: प्रशिक्षणामुळे कामगार अधिक कार्यक्षम बनू शकतील तसेच त्यांना आत्मविश्वास वाढेल.बरोजगारी कमी होईल: कामगारांना कौशल्य प्रशिक्षणामुळे चांगली नोकरी मिळेल व त्यामुळे राज्यातील बेरोजगारी कमी होईलऔद्योगिक विकास: कौशलय प्रशिक्षण पूर्ण करून कामगार राज्यात स्वतःचा एखादा उद्योग सुरु करू शकतील ज्यामुळे राज्याचा औद्योगिक विकास होईल.
कुटुंबाला होणारा फायदा
कुटुंबाच्या आर्थिक उत्पन्नात वाढ: प्रशिक्षण प्राप्त करून कामगारांना बढती मिळेल किंवा अन्य ठिकाणी चांगली नोकरी मिळवून कामगारांच्या उत्पन्नात वाढ होईल व परिणामी कुटुंबाची आर्थिक स्थिती सुधारेल.
कुटुंबाची जीवनशैली सुधारेल: कौशल्याच्या जोरावर कामगारांना चांगली नोकरी मिळेल व त्यामुळे कुटुंबाची जीवनशैल सुधारेल. त्यामुळे त्यांचा सामाजिक तसेच आर्थिक विकास होईल.
दारीद्र्य कमी होणे: कौशल्य विकासामुळे कुटुंबांना दारिद्र्य चक्रातून बाहेर पडण्यास मदत होते.

# कामगारांना विवाहासाठी 30 हजार रुपयांचे आर्थिक सहाय्य

राज्यातील बांधकाम क्षेत्रात काम करणारे कामगार हे आर्थिक दृष्ट्या गरीब असतात तसेच ते कमी वेतनात काम करत असतात त्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती कमकुवत असते व आर्थिक स्थिती गरीब असल्या कारणामुळे त्यांना त्यांचा विवाह करण्यासाठी लागणार खर्च परवडण्यासारखा नसतो व त्यामुळे त्यांना स्वतःचा विवाह करण्यासाठी लागणाऱ्या पैशांसाठी खूप साऱ्या समस्यांचा सामना करावा लागतो तसेच त्यांना विवाहासाठी आवश्यक पैशांसाठी इतरांवर अवलंबून रहावे लागते तसेच त्यांना जास्त व्याज दराने कर्ज घ्यावे लागते त्यामुळे राज्यातील कामगारांच्या या सर्व



समस्यांचा विचार करून राज्य शासनाच्या कामगार विभागाने नोंदीत कामगाराच्या पहिल्या विवाहाच्या खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी 30,000/- रुपयांचे आर्थिक सहाय्य देण्याचा विचार केला. बांधकाम कामगार योजनेअंतर्गत कामगाराच्या पहिल्या विवाहाच्या खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी 30,000/- रुपयांचे आर्थिक सहाय्य देण्यात येते. व लाभाची राशी लाभार्थी कामगाराच्या बँक खात्यात DBT च्या सहाय्याने जमा करण्यात येते.

### योजनेचे उद्दिष्ट

राज्यातील बांधकाम क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांना त्यांच्या पहिल्या विवाहासाठी आवश्यक पैशांसाठी आर्थिक सहाय्य करणे.
कामगारांना विवाहासाठी आवश्यक पैशांसाठी कोणावर अवलंबून राहण्याची गरज भासू नये तसेच कोणाकडून जास्त व्याज दराने कर्ज घेण्याची गरज भासू नये.

### योजनेचे वैशिष्ट्य

योजनेअंतर्गत दिली जाणारी लाभाची राशी कामगाराच्या बँक खात्यात जमा केली जाते.
योजनेअंतर्गत लाभार्थी कामगाराला त्याच्या पहिल्या विवाहाच्या खर्चासाठी 30,000/- रुपयांचे आर्थिक सहाय्य दिले केले जाते.

# प्रधानमंत्री सूर्यघर मुफ्त बिजली योजना?

ग्रामीण भागातील विजेची समस्या सोडवून त्यांना उत्पन्नाचे साधन उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाने प्रधानमंत्री सूर्यघर योजना सुरू केली आहे. या योजनेंतर्गत सोलार पॅनल व इतर यंत्रणा बसविण्यासाठी केंद्र शासनामार्फत काही प्रमाणात अनुदान दिले जाणार आहे. यामुळे नागरिकांना ३०० युनिटपर्यंत वीज मोफत उपलब्ध होणार आहे.सद्यःस्थितीत दगड, कोळशाचा वापर करून वीजनिर्मिती केली जाते. मात्र, जमिनीतील कोळशाचा साठा एक ना एक दिवस संपणार आहे, तसेच कोळसा जळाल्यामुळे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत असल्याने पर्यावरणाचा समतोल बिघडत चालला आहे. भारत हा समशितोष्ण कटिबंधात येणारा देश आहे. देशात मोठ्या प्रमाणात सूर्यप्रकाश उपलब्ध होतो. यातून वीजनिर्मिती केल्यास पर्यावरणाचा होणारा हास थांबण्यास मदत होणार आहे. मात्र, सौरऊर्जेवर वीजनिर्मिती करणे ही खर्चिक बाब असल्याने केंद्र शासन अनुदान देणार आहे. केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री सूर्यघर योजनेमुळे शासनाचा ताण कमी होणार असून यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास रोखण्यास मदत मिळणार आहे. दुर्गम ठिकाणी तर ही योजना ग्रामस्थांसाठी नवसंजीवनी ठरणार आहे.
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १५ फेब्रुवारी रोजी या योजनेचा शुभारंभ केला. नागरिकांना त्यांच्या घरांवर सौरऊर्जा निर्मिती प्लेट बसविण्यासाठी केंद्र शासन अनुदान उपलब्ध करून देणार आहे. ग्रामीण भागात जमिनीवर अशा प्रकारच्या प्लेट उभारता येतील, यातून विजेची निर्मिती होणार आहे.

### कोणाला लाभ मिळणार?

या योजनेचा लाभ मिळण्यासाठी पीएम सूर्यघर या वेबसाईटवर जाऊन रजिस्ट्रेशन करावे लागेल. त्यानंतर जागेची पाहणी केली जाईल व सौरप्लेट उपलब्ध होतील.

### निकष काय?

पर्याप्त जागा उपलब्ध असल्यास व संबंधित व्यक्तीने अर्ज केल्यास त्याला या योजनेचा लाभ दिला जाणार आहे. मात्र, अनुदानाची मर्यादा जास्तीत जास्त ७८ हजार रुपये ठरविण्यात आली आहे. बहुतांश गावे जंगलाने व्यापली आहेत. या गावांमध्ये वीज पुरवठ्याची समस्या अतिशय गंभीर आहे. थोडाही वादळ वारा झाला तरी वीजपुरवठा खंडित होतो. त्यामुळे सोलारच्या माध्यमातून वीजनिर्मिती झाल्यास महावितरणच्या विजेची किमान दिवसा तरी गरज पडणार नाही. यामुळे नागरिकांनी मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे

# प्रधानमंत्री किसान संपदा योजनेची वैशिष्ट्ये आणि फायदे

केंद्र सरकारने प्रधानमंत्री किसान संपदा योजना सुरू केली आहे. या योजने द्वारे अन्न प्रक्रिया आणि कृषी-सागरी प्रक्रियेसाठी क्लस्टर तयार केले जातील. अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय ही योजना राबवणार आहे. किसान संपदा योजना हे एक संपूर्ण पॅकेज आहे जे फार्म गेटपासून रिटेल आउटलेटपर्यंत प्रभावी पुरवठा साखळी व्यवस्थापनासह आधुनिक पायाभूत सुविधांची मोठ्या प्रमाणावर निर्मिती करण्यास सक्षम करेल. देशाचा अन्न प्रक्रिया उद्योग वाढेल आणि शेतकऱ्यांनाही नफा वाढेल. याव्यतिरिक्त, या योजनेमुळे शेतकऱ्यांना अधिक पैसे कमविण्यास मदत होईल. याशिवाय, पंतप्रधान किसान संपदा योजना देशाच्या ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात नोकरीच्या संधी उपलब्ध करून देईल. या कार्यक्रमांतर्गत 2020 मध्ये 32 नवीन प्रकल्प सुरू करण्यात आले. यासाठी सरकारने एकूण 406 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला.

प्रधानमंत्री किसान संपदा योजनेचे प्राथमिक ध्येय अन्न आणि कृषी-सागरी प्रक्रियेसाठी क्लस्टर तयार करणे हे आहे. ही योजना फार्म गेटपासून किरकोळ स्थानापर्यंत प्रभावी पुरवठा साखळी व्यवस्थापनासह समकालीन पायाभूत सुविधांचा एक मोठा भाग तयार करेल. या कार्यक्रमामुळे कृषी उद्योगाची प्रगती होईल. शिवाय, या पद्धतीमुळे शेतकऱ्यांना जास्त मोबदला मिळेल.
या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या उत्पन्नातही वाढ होणार आहे. याशिवाय,हि योजना देशाच्या ग्रामीण भागात लक्षणीय रोजगार संधी निर्माण करेल. ही योजना लागू करून, पुरवठा साखळी पूर्णपणे जोडली जाईल आणि सध्याच्या अन्न प्रक्रिया सुविधांचा विस्तार आणि आधुनिकीकरण केले जाईल.शेतकरी, प्रक्रिया करणारे आणि व्यापारी यांना एकत्र करून, ही योजना कृषी उत्पादनाला बाजारपेठेशी जोडण्याचे साधन देईल. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी



आणि ग्रामीण भागात रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी. योजना क्लस्टर पद्धतीवर आधारित आहे.मेगा फूड पार्कमधील पुरवठा साखळी पायाभूत सुविधांमध्ये कोल्ड चेन, मुख्य आणि केंद्रीय प्रक्रिया केंद्रे, संकलन केंद्रे आणि उद्योजकांच्या मालकीच्या अन्न प्रक्रिया युनिट्ससाठी सुमारे 25 ते 30 पूर्ण विकसित भूखंडांचा समावेश आहे.प्रधानमंत्री किसान संपदा योजनेचा कोल्ड चेन उपक्रम एकात्मिक कोल्ड चेन आणि संरक्षण पायाभूत सुविधा प्रदान करेल. ग्राहकांना फॉर्म गेट वरून एकात्मिक सेवा सतत मिळण्यासाठी. संपूर्ण पुरवठा साखळीसह पायाभूत सुविधा निर्माण करणे हा योजनेच्या कामाचा एक भाग आहे.बागायती, सेंद्रिय, दुग्धशाळा आणि इतर उत्पादनांचे वितरण सुलभ करण्यासाठी-मांस आणि कुक्कुटपालनासह-योजनेमध्ये प्री-कूलिंग, वजन, वर्गीकरण, प्रतवारी आणि वॅक्सिंग सुविधा फॉर्म स्तरावर तसेच बहु-उत्पादन कोल्ड समाविष्ट आहेत. स्टोरेज, पॅकिंग सुविधा, वितरण केंद्रांवर ब्लास्ट फ्रीझिंग आणि मोबाईल कूलिंग युनिट्स. या प्रकल्पात शेत स्तरावर कोल्ड चेन पायाभूत सुविधांच्या विकासावर विशेष लक्ष दिले जाते.प्रक्रिया पातळी वाढवण्यासाठी प्रक्रिया आणि जतन क्षमता निर्माण करणे हे या योजनेचे प्राथमिक उद्दिष्ट आहे. सध्याच्या अन्न प्रक्रिया सुविधांचा विस्तार आणि सुधारणा करण्यासाठी. शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचे शेल्फ लाइफ वाढवण्यासाठी या प्रकल्पाद्वारे विविध उपाय देखील मिळतील.कापणीनंतर उत्पादनाचे शेल्फ लाइफ वाढवण्यासाठी विविध युनिट्सच्या प्रक्रिया ऑपरेशन्ससाठी. या प्रयत्नामुळे तयार उत्पादनाची क्षमता वाढेल. याव्यतिरिक्त, या डिझाइनमध्ये नवीन युनिट्सची निर्मिती तसेच सध्याच्या युनिट्सचे नूतनीकरण आणि वाढ समाविष्ट आहे.हि योजना सांप्रदायिक सुविधा आणि आधुनिक पायाभूत सुविधा निर्माण करेल. क्लस्टर मॉडेलवर आधारित अन्न प्रक्रिया युनिट्सची स्थापना करण्यासाठी, उद्योजकांचा समूह समकालीन पायाभूत सुविधांच्या साखळीद्वारे उत्पादक, शेतकरी आणि प्रोसेसर यांच्याशी जोडला गेला पाहिजे.सरकारने या प्रकल्पात दोन घटकांचा समावेश केला आहेफार्म गेटवर प्राथमिक प्रक्रिया/संकलन सुविधा, समोरच्या बाजूला समकालीन रिटेल स्टोअर्स आणि इन्सुलेटर/रेफ्रिजरेटर वाहतुकीद्वारे लिंकेजसाठी या कार्यक्रमात आर्थिक सहाय्य दिले जाईल.फळे, भाजीपाला, दुग्धजन्य पदार्थ, मांस, कुक्कुटपालन, मासे, कंपोस्ट उत्पादक जे शिजवण्यासाठी तयार आहेत, मध, नारळ, मसाले, मशरूम इत्यादी नाशवंत कृषी आणि बागायती वस्तूंचा समावेश या योजनेत केला जाईल.हि योजना शेतकऱ्यांना वाजवी किंमतीची हमी देईल.